◆ जुलै २००४
◆ वर्ष चौथे
◆ अंक सातवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुस्तक परिचय** | |
| द रेनमेकर : अनु. अनिल काळे | १९ |
| फर्स्ट टु डाय : अनु. रविंद्र गुर्जर | २३ |
| वायू प्रदूषण : डॉ. किशोर / नलिनी पवार | २७ |
| 'हॅलो मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय' : व. कृ. जोशी | ३० |
| पोलिसकथा : व. कृ. जोशी | ३४ |
| **पुरस्कार** | ३७ |
| **श्रद्धांजली** | ३९ |
| **बालनगरी** | ४३ |

✠ मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

# ‘वर्ल्ड बुक कॅपिटल’: एक अभिनव उपक्रम

इसवी सन २००१ पासून युनेस्कोच्या वतीने एक अभिनव उपक्रम राबवला जात आहे. तो म्हणजे नागरी पातळीवर ग्रंथविषयक जाणीव जागृतीचा! ‘जागतिक ग्रंथ राजधानी’चा! दरवर्षी एकेका शहराची जागतिक ग्रंथ राजधानी म्हणून निवड करून, त्या त्या शहराची वाङ्मयीन परंपरा अधोरेखित करण्याचा हा प्रयत्न सर्वच शहरांना प्रेरणादायक व प्रोत्साहनपर ठरणारा आहे.आपल्या देशातील, आपल्या शहरातील साहित्यकलाविषयक वातावरण चैतन्यशाली व उपक्रमशील ठेवण्यासाठी एक प्रकारची स्पर्धा निर्माण करणारा आहे. इ. स. २००१ मध्ये माद्रिद (स्पेन)ची निवड वर्ल्ड बुक कॅपिटल म्हणून झाली होती. त्यानंतर अलेक्झांड्रिया (इ. स. २००२) ला हा मान मिळाला. इ. स. २००३ मध्ये आपल्या दिल्ली शहराला हा गौरव प्राप्त झाला. अँटवर्प हे शहर यंदा ग्रंथ राजधानीचा ध्वज मिरवत आहे. पुढच्या वर्षासाठी ऑस्ट्रेलियातील मॉँट्रियलची निवड झाली आहे. इ. स. २००६ साठी इच्छुक शहरांकडून युनेस्कोने आवेदनपत्रे मागवली आहेत.

‘जागतिक ग्रंथ राजधानी’चा हा मान मिळवण्यासाठी काही अपेक्षांची पूर्तता करावी लागते.

**१.** जागतिक ग्रंथ दिन आणि स्वामीत्व हक्क (कॉपीराइट) दिवस हा २३ एप्रिल रोजी साजरा होतो. आंतरराष्ट्रीय ग्रंथ राजधानीचे वर्ष या दिवसापासून सुरू होते आणि पुढच्या ग्रंथ दिवसापर्यंत चालते. या काळात त्या देशातील नगरपालिका, महापालिका, राज्ये, यांनी ग्रंथप्रसाराला आणि वाचन संस्कृतीला चालना देणारे विविध उपक्रम राबवावेत, त्यासाठी पुढाकार घ्यावा.

**२.** राजधानी म्हणून निवडल्या गेलेल्या शहराने आपल्या परिसरातील सांस्कृतिक, सामाजिक, साहित्य क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांच्या मदतीने, लेखक, प्रकाशक, पुस्तक विक्रेते, ग्रंथपाल, महाविद्यालये व विद्यापीठे वगैरेंच्या सहकार्याने वर्षभरात वाङ्मयीन चर्चा, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शने, लेखनस्पर्धा, लेखक-वाचक संवाद वगैरे उपक्रम राबवावे.

**३.** पुस्तकांचा व्यापक पातळीवर प्रसार व उठाव होण्यासाठी तसेच वाचन संस्कृतीचा विकास होण्यासाठी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या संस्थांची मदत मिळवून, व्यापक प्रकल्प हाती घेणे.

राजधानी म्हणून निवड करण्यासाठी नेमण्यात येणाऱ्या समितीत आंतरराष्ट्रीय प्रकाशन संघ, आंतरराष्ट्रीय पुस्तकविक्रेता महासंघ, ग्रंथालय महासंघ, युनेस्को यांच्या प्रतिनिधींचा समावेश असतो.

भारताच्या राजधानीला, दिल्लीला २३ एप्रिल २००३ ते २३ एप्रिल २००४ पर्यंत



‘जागतिक ग्रंथ राजधानी’चा मान मिळाला होता. त्या निमित्ताने विविध उपक्रमांनी राजधानी दिल्लीतील वाङ्मयीन व सांस्कृतिक वातावरणात नवे चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. २३ एप्रिल २००४ रोजी नॅशनल बुक ट्रस्ट आणि भारतीय प्रकाशक महासंघ यांनी या वर्षाचा सांगता समारंभ आयोजित केला होता. भारतीय समाजाला वाचनप्रिय समाज बनविण्यासाठी काय करावे या विषयी यावेळी अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. वाचनसंस्कृतीचा प्रसार हे आपले ध्येय विशाल आणि उदात्त आहे; परंतु त्या मार्गात अडचणीही अनेक आहेत याकडे त्यांनी लक्ष वेधले. पुस्तके ही आपल्या समाजाच्या आणि देशाच्या फार अल्प भागातच पोचतात; इतरत्र ती दुर्मिळ असतात; सहजी उपलब्ध नसतात आणि त्यामुळे थोडेफार शिक्षण झालेल्या व्यक्तीलाही आपली वाचनाची हौस भागवणे अवघड जाते. भारतातील निरक्षरतेचे प्रमाणही मोठे आहे; हे लक्षात घेतले तरी, साक्षरांचीही संख्या काही कमी नाही. परंतु त्यांच्यापर्यंत पुस्तके पोचू शकत नाहीत; ही देखील विदारक वस्तुस्थिती आहे. पोस्टाचे दरही पुस्तकांच्या सुलभ वितरणाच्या मार्गात मोठा अडसर निर्माण करतात असेही प्रकाशक महासंघाचे अध्वर्यू दीनानाथ मलहोत्रा यांनी नमूद केले.

नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष बी. के. शर्मा यांनी ‘राजधानी वर्षात’ आयोजित कार्यक्रमांचा आढावा घेतला. नॅशनल बुक ट्रस्टने या वर्षात लंडन, बर्लिन, सिंगापूर, मॉरिशस, बँकाक वगैरे ठिकाणी भारतीय ग्रंथांची प्रदर्शने भरवली आणि विविध विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली.

भारतीय प्रकाशक महासंघाने ‘ग्रंथ राजधानी’च्या निमित्ताने आकर्षक माहितीपत्रके आणि भित्तिचित्रे प्रकाशित केली. ती भारतात सर्वदूर वितरित केली. मानव संसाधन विकास मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली माजी पंतप्रधान, विविध राज्यांचे राज्यपाल, केंद्रीय मंत्री आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री शीला दीक्षित प्रभृतींची एक समिती नेमण्यात आली. दिल्लीत शीला दीक्षित यांच्या हस्ते या ‘राजधानी वर्षाचे’ उद्घाटन २३ एप्रिल २००३ रोजी झाले. इंडियन रिप्रोग्राफिक राइटस ऑर्गनायझेशन तर्फे १० मे २००३ रोजी उपराष्ट्रपती भैरोसिंग शेखावत यांच्या निवासस्थानी एक परिसंवाद घेण्यात आला. परदेशी पुस्तकांच्या अनुवादाचे हक्क मिळवण्यासंबंधी काही आचारसंहिता ठरवण्याविषयी त्या परिसंवादात विचारविमर्श करण्यात आला. यात मराठी प्रकाशकांचे प्रतिनिधित्व अनिल मेहता यांनी केले.

भारतीय प्रकाशक महासंघाने दिल्ली ग्रंथजत्रेच्या निमित्ताने ‘ग्रंथ राजधानी’च्या प्रसारासाठी जाहिराती, बॅनर्स, बस पॅनल्स वगैरे मार्गांद्वारे विविध मार्ग चोखाळले. प्रगती मैदानावर हजारो पोस्टर्स लावून दिल्लीच्या ‘ग्रंथ राजधानी’चा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोचवण्यासाठी प्रयत्न केले.

जानेवारी २००४ मध्ये ‘मेकिंग इंडिया ए बुक रीडिंग सोसायटी’या विषयावर दोन दिवसांची राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. या परिषदेत लेखक-प्रकाशक, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार, विचारवंत यांचा सहभाग होता. भारतातील अग्रगण्य प्रकाशकांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. समर्पणशील वृत्तीने प्रकाशन व्यवसायात कार्य केल्याबद्दल काही जणांना मानचिन्हे देण्यात आली.

### टीव्हीपेक्षा वाचनाला मुलांची जास्त पसंती

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आणि पुस्तकांची गोडी निर्माण होणे हा ग्रंथसंस्कृतीच्या विकासाचा मूलभूत पाया आहे हे लक्षात घेऊन दिल्लीतील अनेक शाळांमधून बालसाहित्याची

प्रदर्शने भरवण्यात आली. मुलांसाठी पुस्तक वाचन, चित्ररेखाटन, वाचलेल्या पुस्तकांचे रसग्रहण यांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

प्रगती मैदानावर भरलेल्या ग्रंथजत्रेनिमित्ताने ब्रिजिंग बॉर्डर्स या संशोधन संस्थेने ८ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांमधील वाचनाच्या आवडीनिवडी संदर्भात निरनिराळ्या शाळांमध्ये जाऊन एक सर्वेक्षण केले. त्या सर्वेक्षणाचा प्रमुख निष्कर्ष असा की फावल्या वेळात इतर करमणुकीच्या साधनांपेक्षा पुस्तके वाचण्यात मुले जास्त रमतात. ३२ टक्के मुलांनी फावल्या वेळात टीव्ही बघतो असे म्हटले; तर ३६ टक्के मुलांनी टीव्ही पेक्षा पुस्तक वाचण्यात जास्त आनंद मिळतो असे नमूद केले. मुलांपेक्षा मुलींमध्ये वाचनाची प्रवृत्ती अधिक बलवत्तर असल्याचेही आढळून आले.

शाळकरी मुले काय वाचतात? ७६ टक्के मुले हलक्याफुलक्या गोष्टींची रंजक पुस्तके वाचतात. (त्यातच चित्रकथांचा समावेश होतो.) १५ टक्के मुलांना साहसकथा आणि क्रीडाविषयक पुस्तके आवडतात. १४ टक्के मुले कादंबऱ्या वाचतात. १२ टक्के मुले रहस्यकथांमध्ये रमतात तर १० टक्के मुलांना कोडी व बुद्धीला व्यायाम देणारी पुस्तके पसंत आहेत. राजधानी दिल्लीतील मुलांना पुस्तके वाचण्यात एवढा रस वाटतो, त्यामुळे 'जागतिक पुस्तक राजधानी'म्हणून दिल्लीची जी निवड झाली ती सार्थच ठरली, असा या सर्वेक्षणाने सर्वांना दिलासा मिळाला.

'ग्रंथ राजधानी'च्या कल्पनेमागे त्या त्या शहराला वा देशाला वाटणारा ग्रंथसंस्कृतीचा अभिमान वाढविण्याचा हेतू आहे. या दृष्टीने भारतातील विविध राज्ये आणि शहरे यांच्यातही अशी स्पर्धा सुरू व्हायला हवी. प्रत्येक गावात उत्तम ग्रंथालये असणे, त्यांनी सांस्कृतिक केंद्र म्हणून काम करणे, साहित्य संस्थांतर्फे वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्यक्रम होणे, ग्रंथप्रदर्शने भरविणे, वाचक-रसिकांनी विविध क्षेत्रात कार्यरत असणे याची गरज असते. त्यांना चालना मिळण्यासाठी प्रत्येक शहराने स्वत:ची एक सांस्कृतिक, सामाजिक ओळख व आत्मप्रतिमा निर्माण करण्याची आणि जपण्याची आवश्यकता असते. पुणे शहरालाही या संदर्भात मोठी संधी आहे. महाराष्ट्रात पुणे या शहराने आरंभापासूनच आपली एक वेगळी प्रतिमा जपलेली आहे; आणि सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात अनेक संस्था वर्षानुवर्षे चालवून आपली एक प्रबोधनाची परंपरा सिद्ध केली आहे. प्रकाशनक्षेत्रातही आज पुणे आघाडीवर आहे. मराठीतील सहाशे प्रकाशन संस्थांपैकी अडीचशे पुण्यात आहेत. ग्रंथव्यवहाराचे हे एक अग्रगण्य केंद्र आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर पुण्याच्या ग्रंथसंस्कृतीचा सन्मान कधी होणार? भारतीय आणि राज्य पातळीवर ही त्या दृष्टीने काही होऊ शकले तर पुण्याच्या वाङ्मयीन परंपरेला नवी चालना मिळू शकेल. दिल्ली ही भारताची राजधानी ग्रंथ राजधानी म्हणूनही जागतिक मान्यता मिळवते; पुणे ही महाराष्ट्राची सांस्कृतिक, बौद्धिक राजधानी आहे, व ग्रंथव्यवहाराचीही अघोषित राजधानी आहेच. दिल्लीपेक्षाही येथे जास्त वाङ्मयीन उपक्रम वर्षभर चालू असतात. तेव्हा पुण्याने याच दिशेने आपली घोडदौड जारी ठेवावी. आणि जागतिक ग्रंथ राजधानीच्या बहुमानावर आपला रास्त हक्क सांगावा.

**-संपादक**



## साहित्यवार्ता

### * जीवनयात्रा- अभिनेता दिग्दर्शक मास्टर विनायकचे प्रकाशन

मास्टर विनायक यांच्या जीवनावर भाई भगत यांनी लिहिलेल्या 'जीवनयात्रा : अभिनेता, दिग्दर्शक मा. विनायक' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. वसंत शिंदे यांच्या हस्ते झाले. चित्रपट समीक्षक अशोक राणे, मास्टर विनायक यांचे सुपुत्र जयप्रकाश कर्नाटकी, कुंदा भगत, अभिनेत्री आशा काळे, टी. जयश्री, प्रकाशक अनिल मेहता यावेळी उपस्थित होते.

''मराठी चित्रपट निर्मितीसाठी सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या पंधरा लाख रुपयांच्या अनुदानावर लोक आठ-दहा दिवसांत दुय्यम दर्जाचे चित्रपट काढतात; मराठी चित्रपटसृष्टी जिवंत ठेवायची असेल, तर अनुदानासाठी निकष ठरवायला हवेत,'' असे मत ज्येष्ठ छायाचित्रकार वसंत शिंदे यांनी व्यक्त केले.

श्री. शिंदे म्हणाले, ''या अनुदान योजनेमुळे लोक कमी दिवसांत अभ्यास न करता चित्रपट काढतात; याकडे मुख्यमंत्री, सांस्कृतिकमंत्री यांनी लक्ष द्यायला हवे. असे चित्रपट काढणाऱ्यांना जाब विचारला नाही, तर मराठी चित्रपटांची परिस्थिती यापेक्षाही वाईट होईल.''



डावीकडून: *जयप्रकाश कर्नाटकी, वसंत शिंदे, अनिल मेहता, अशोक राणे व कुंदा भगत*

मा. विनायकांनी त्या काळात केलेली चित्रपट निर्मिती, त्यांना भेटलेली माणसे असे इतिहासाचे संचितच भगत यांनी आजच्या पिढीपुढे या पुस्तकातून मांडले आहे, असे मत व्यक्त करून राणे म्हणाले की, भगत यांनी मा. विनायक यांचे चरित्र कौटुंबिक जिव्हाळ्याने लिहिले आहे. विनायक यांची चित्रपटाबद्दल असलेली तळमळ भगत यांनी या पुस्तकातल्या शब्दाशब्दातून व्यक्त केली आहे. मा. विनायक यांच्यावर चित्रपट करता येईल एवढे मोल या पुस्तकाचे आहे. भगत यांच्या निधनानंतर त्यांची प्रत्येक साहित्यकृती वाचकांपर्यंत आणण्याचा आपला प्रयत्न राहील, असे श्रीमती भगत यांनी या वेळी सांगितले.

वडिलांचे (मा. विनायक) निधन झाले तेव्हा आपण केवळ दीड वर्षांचे होतो. त्यामुळे त्यांची काहीच आठवण आपल्याकडे नाही असे सांगून जयप्रकाश कर्नाटकी भावनावश होऊन म्हणाले की, आठव्या वर्षी सेंट्रल प्लाझा या चित्रपटगृहात 'ब्रह्मचारी'पाहायला गेलो तेव्हा वडिलांना पहिल्यांदा पडद्यावर पाहिले. तेव्हा साऱ्या चित्रपटगृहाला हसविणारा ब्रह्मचारी फक्त एकाच प्रेक्षकाला म्हणजेच स्वत:च्या मुलाला मात्र हसवू शकला नाही. वडिलांचे दर्शन झाल्यानंतर आपण पडद्याला नमस्कार केला, असे सांगताना कर्नाटकी यांना अश्रू आवरले नाहीत.

भाईंच्या लिखाणामुळे चित्रपटसृष्टीच्या इतिहासाचे संचित पुढच्या पिढीपर्यंत आले असल्याचे श्री. अशोक राणे यांनी सांगून, या पुस्तकाच्या आधारे मास्टर विनायक यांच्या जीवनावर चित्रपट काढावा अशी अपेक्षा व्यक्त केली. सुनीता दांडेकर यांनी सूत्रसंचालन केले. श्री. अनिल मेहता यांनी आभार मानले.

### * 'कादंबरीमय शिवकाला'चे रायगडावर प्रकाशन

समाजाने निर्माण केलेला जाणता राजा आणि या राजाने घडविलेला काळ यांचे प्रतिभासंपन्न दर्शन घ्यायचे असेल तर 'कादंबरीमय शिवकाल' हा खंड पुन: पुन्हा वाचावा, असे प्रतिपादन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी गो. नी. दांडेकरांच्या शिवकालावरील पाच कादंबऱ्यांच्या एकत्रित खंडाचे प्रकाशन करताना केले.

गो. नी. दांडेकरांचा स्मृतिदिन आणि शिवराज्याभिषेक दिन यंदा एकाच दिवशी आले होते. या निमित्ताने रायगडावर झालेल्या समारंभात पुरंदरे यांनी गोनीदांच्या एकाच खंडातील या पाच कादंबऱ्या प्रकाशित केल्या. सूर्योदयाच्या मुहूर्तावर झालेल्या या कार्यक्रमाला शेकडो शिवप्रेमी हजर होते. यावेळी 'हे तो श्रींची इच्छा' या कादंबरीतील राज्याभिषेक सोहळ्याच्या भागाचे अभिवाचन विजय आणि वीणा देव यांनी केले. शिवरायांच्या राजसभेच्या जागीच हा कार्यक्रम पार पडला.

इतिहासाचे अभ्यासक निनाद बेडेकर यांनी अभ्यास आणि प्रतिभा यांच्या अपूर्व संगमातून गोनीदांचे शिवकालावरील लेखन झाले असल्याचे नमूद केले. या खंडाची पहिली आवृत्ती नोंदणीतच संपल्याने दुसरी प्रकाशित होत असल्याची माहिती गोनीदांच्या कन्या आणि 'शिवकाल'च्या प्रकाशक वीणा देव यांनी यावेळी दिली.

### * वेगवेगळ्या क्षेत्रांतील लोकांनीही लिखाण करायला हवे : कुलकर्णी

''मराठी वाङ्मय अधिक समृद्ध होण्यासाठी लेखकांनी चाकोरीबद्ध जीवन सोडून विविध प्रकारचे जीवनानुभव घ्यायला हवेत. तसेच, वेगवेगळ्या जीवनक्षेत्रांतील लोकांनीही लिखाण करायला पाहिजे,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

ॲड. भरत शिंदे यांनी लिहिलेल्या 'चकवा' या कादंबरीचे प्रकाशन डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. भास्करराव आव्हाड अध्यक्षस्थानी होते. पुष्पा शिंदे, प्रकाशक अरुण जाखडे, दिलीपसिंह ठाकूर आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. कुलकर्णी म्हणाले,''चकवा ही कादंबरी केवळ कायद्याच्या ज्ञानावर आधारित नसून, मानवी मन, समस्या शोधण्याचा प्रयत्न यामध्ये केला आहे. ही एक उत्कट संसारकथा आहे. जे साहित्य वाचकाला अंतर्मुख, अनुभवसमृद्ध करते. ज्यामध्ये अनुभूतीची अनेक केंद्रे असतात, ते साहित्य चांगले असते. हाच अनुभव या कादंबरीत येतो.ॲड. शिरीष शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. श्री. जाखडे यांनी आभार मानले.

### * दुर्मिळ ग्रंथांचे आणि दस्तऐवजांचे आगळे प्रदर्शन

वाढत्या किमतींची चिकित्सा, भारतातील शिक्षणाचा आढावा, भारतातील बँका, भारतीय रेल्वेचा अभ्यास, रेल्वे; तसेच जलमार्गाने होणाऱ्या व्यापाराचे विश्लेषण... आणि असे बरेच अव्वल ब्रिटिश अमदानीतील दुर्मिळ दस्तऐवज हिंद सेवक संघाच्या 'डॉ. धनंजयराव गाडगीळ ग्रंथालया'त भरलेल्या ग्रंथ प्रदर्शनात एकत्र बघायला मिळाले.

शताब्दी वर्षातील पदार्पणाचे औचित्य साधून दुर्मिळ पुस्तके, अहवाल तसेच, अन्य दस्तऐवजांचा खजिना जिज्ञासूंसाठी खुला करणाऱ्या दुर्मिळ ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जी. काकडे यांच्या हस्ते झाले.

आर्थिक तसेच सामाजिक विषयांसंदर्भात संशोधन करू इच्छिणाऱ्यांना जणू पर्वणीच वाटावी, असेच या ग्रंथमेळ्याचे स्वरूप होते. आपल्या अमलाखालील हिंदुस्थानच्या आर्थिक तसेच, सामाजिक पैलूंचा सांगोपांग अभ्यास करण्यात तत्कालीन ब्रिटिश शासनकर्त्यांना किती रुची होती, याचे अनेक पुरावे या प्रदर्शनात पाहावयास मिळाले. 'ज्ञानप्रकाश' या तत्कालीन पुण्यातील प्रतिष्ठित वृत्तपत्राचे १८४९ मधील अंक, सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांचे जुने अंक, निकोलस मॅकियावेललिखित मूळच्या इटालियन भाषेतील ग्रंथाचा १६८० मध्ये झालेला इंग्रजी अनुवाद, पहिली पंचवार्षिक योजना तसेच, पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांसंदर्भातील दस्तऐवज अशा संदर्भ साहित्यामुळे हे प्रदर्शन समृद्ध बनले होते.

हिंद सेवक संघाचे संस्थापक नामदार गोपाळ कृष्ण गोखले, तसेच गोखले अर्थशास्त्र संस्थेचे अध्वर्यू डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या लेखनाचा पैस सादर करणारी दोन दालने, हे या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य. श्रीनिवास शास्त्री संपादित 'सर्व्हंट ऑफ इंडिया' या नियतकालिकाचे अंकही प्रदर्शनात मांडलेले होते.

### * प्रेक्षक अधिक काळ टीव्ही पाहू लागले!

जगभरातील टीव्ही प्रेक्षकांच्या दररोजच्या टीव्ही पाहण्याच्या वेळेत पंधरा मिनिटांची वाढ झाली असून टीव्ही पाहण्याचे प्रमाण सरासरी तीन तास व ३९ मिनिटे झाले आहे.

या पाहणीत सर्वसामान्यांचा कल स्पष्ट करणारी आणखीही गंमतीदार माहिती समोर

आली आहे. टीव्ही मालिका किंवा नाटकांना सर्वाधिक प्रेक्षक लाभत असून जगात या प्रकारचे कार्यक्रम पाहणाऱ्यांचे प्रमाण ४१ टक्के आहे. असे असले तरी आधल्या वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण कमी झाले आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमांना या वर्षी लोकांनी प्राधान्य दिल्याचे दिसले. संगीतमय किंवा स्पर्धात्मक कार्यक्रमांचा यात समावेश आहे.

युरोडेटा टीव्ही वर्ल्डवाइडने ७२ देशांमध्ये हे सर्वेक्षण केले. ६००हूनही अधिक वाहिन्या पाहणाऱ्या अडीच अब्ज लोकांचा कल यातून स्पष्ट झाला. दिवसाला चार तास २९ मिनिटे टीव्ही बघणारे जपानी लोक आणि चार तास २५ मिनिटे पाहणारे अमेरिकन हे आघाडीवर आहेत.

आशियाई भागांतले टीव्ही पाहण्याचे प्रमाण दिवसाला ४७ मिनिटांनी वाढले असून आता या भागात एकूण तीन तास २३ मिनिटे टीव्ही पाहिला जातो. युरोपात हेच प्रमाण तीन तास २३ मिनिटांचे आहे.

त्यानंतर पश्चिम आशिया व दक्षिण अमेरिकेचा क्रमांक लागतो आणि दक्षिण आफ्रिकेत सर्वात कमी वेळ म्हणजे दोन तास ५९ मिनिटे टीव्ही पाहिला जातो. मात्र, ही आकडेवारी संपूर्ण आफ्रिका खंडाचे प्रतिनिधित्व करत नाही; कारण या खंडात केवळ या एकाच देशाचा पाहणीत समावेश होता.

### * कार्टून चॅनल्स बालमानसशास्त्रज्ञांचा सल्ला घेतात

दिवसभर टीव्हीसमोर बसून देमार कार्टून पाहणाऱ्या लहान मुलांच्या पालकांसाठी, विशेषत: आयांसाठी चांगली बातमी आहे. आता बहुतेक कार्टून चॅनल्सवर निव्वळ मारधाड किंवा धांगडधिंगा असणार नाही. अनेक चॅनल्सवर बालमानसशास्त्रज्ञांच्या सल्ल्याने कार्यक्रम दाखविण्याचे प्रमाण वाढले आहे. थोडक्यात, निव्वळ मनोरंजन नव्हे, तर लहान मुलांच्या ज्ञानात आणि जाणीवांमध्येही भर पडेल असे काहीतरी दाखविण्याकडे कार्टून चॅनल्सचा कल वाढत चालला आहे.

मिकी अँड डोनाल्ड, टॉम अँड जेरी, हीमॅन, सुपरमॅन या 'नेहमीच्या यशस्वी' कार्टून मंडळींबरोबरच रामायण, महाभारत, तेनालीरामन आदी अस्सल भारतीय लोककथाही कार्टून चॅनल्सवर अवतरू लागल्या होत्याच. आता कार्टून नेटवर्क, पोगोसारखे काही चॅनल्स शिक्षणतज्ज्ञ, बाल मानसशास्त्रज्ञ आदींचे सल्ले घेतात.

पोगो आणि कार्टून नेटवर्कची मालकी असलेल्या अर्नर एंटरटेनमेंटचे वरिष्ठ उपाध्यक्ष इयन डायमंड म्हणाले की, आम्ही आता जवळजवळ प्रत्येक कार्यक्रम अशा तज्ज्ञांकडून तपासून घेतो. यासाठी आम्ही दिल्ली, मुंबई आणि बंगलोर येथील १५ तज्ज्ञांशी चर्चा केली. रंग, आकार, मुळाक्षरे, आकडेमोड अशा क्रमाने वाढत जाणाऱ्या मुलांच्या आकलनशक्तीशी या कार्यक्रमांचे साधर्म्य पाहिजे. त्याचबरोबर मैत्री, मित्राशी जुळवून घेण्याशी, त्याच्याबरोबर वाटून घेण्याची प्रवृत्ती आदी सामाजिक गुणांनाही या कार्यक्रमांत स्थान मिळाले पाहिजे, असे तज्ज्ञांचे म्हणणे असते.

### * दहशतवादाचे चित्रण करणाऱ्या कविता

देशामध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांत वाढणाऱ्या दहशतवादाचे प्रतिबिंब डॉ. सुहास जेवळीकर यांच्या कवितेत सखोलपणे उतरले असून, त्यांची वैद्यकीय प्रतिमासृष्टीही



मराठीच्या समृद्धतेत भर घालणारी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी डॉ. यशवंत मनोहर यांनी औरंगाबाद येथे केले.

लोकवाङ्मय गृहाने प्रकाशित केलेल्या डॉ. जेवळीकर यांच्या 'दहशतीची दैनंदिनी' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना मनोहर म्हणाले की, विविध क्षेत्रांतील दहशतवादाची कारणे, त्याचा व देशाच्या तत्त्वज्ञानाचा इतिहास लक्षात घेणे गरजेचे आहे. समाजजीवनातील संघर्ष, त्याचा भूत, वर्तमान व भविष्यकाळातील जीवनावर परिणाम आणि या संघर्षाने केलेल्या जखमा हे सारे लक्षात घेऊनच कवींनी लिखाण करायला हवे.

या दहशतीचा धागा पकडून डॉ. भा. ल. भोळे यांनी राजकीय धर्मांधता, साम्राज्यवाद, अणुबाँबचा स्फोट, गुजरातमधील संहार यांचा उल्लेख केला आणि दहशतीने ग्रासलेले सामान्यजनही वैयक्तिक जीवनात दुसऱ्यांवर दहशत निर्माण करतात, असे नमूद केले. यावेळी डॉ. सुरेंद्र जोंधळे, सतीश काळसेकर, जयदेव डोळे यांचीही भाषणे झाली.

### * 'बालभारती'च्या निर्णयामुळे पुस्तक विक्रेत्यापुढे नवे संकट

इंग्रजी माध्यमाच्या शाळांबरोबरच विनाअनुदानित शाळांनाही पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडून (बालभारती) थेट पुस्तके उपलब्ध करून देण्याची योजना म्हणजे पुस्तक विक्रेत्यांसाठी नवे संकट आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहे.

पहिली ते दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मोफत देण्याचा निर्णय राज्य शासनाने यंदा जाहीर केला. त्याची पूर्वकल्पना पाठ्यपुस्तक विक्रेत्यांना दिली नसल्याने त्यांना या निर्णयाचा फटका बसला. त्याची दखल घेऊन सात जूनपर्यंत पुस्तकविक्रेत्यांकडील पुस्तके 'बालभारती'मध्ये परत घेण्यात येतील, असे शासनाने जाहीर केले.

दरम्यान,'बालभारती'तर्फे आणखी एक निवेदन जारी करण्यात आले. त्यानुसार मोफत पाठ्यपुस्तक योजनेमधून वगळण्यात आलेल्या शाळांसाठी 'बालभारती'च्या भांडारामधून पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यासाठी पुस्तकाच्या किमतीच्या १५ टक्के सूटही दिली जाणार आहे. इंग्रजी माध्यमासह विनाअनुदानित शाळांनाही त्याचा लाभ घेता येणार आहे.

शासनाच्या या निर्णयावर पाठ्यपुस्तक विक्रेत्यांनी नाराजी व्यक्त केली. 'राज्य शासनाने पाठ्यपुस्तक विक्रेत्यांचा व्यवसाय संपविण्याचा घाट घातला आहे,' असा आरोप विक्रेत्यांतर्फे करण्यात आला. विनाअनुदानित शाळांना 'बालभारती'या भांडारामधून प्रथमच पुस्तके उपलब्ध करून दिली जात आहेत. या निर्णयामुळे शाळांना नफा कमविण्याचे आणखी एक संधी मिळणार आहे, अशी भीती व्यक्त करण्यात आली.

### * बालहक्कांकरिता लढणाऱ्यांसाठी संदर्भग्रंथ

बालकांना 'हक्क' असतात, ही संकल्पना विसाव्या शतकात उदयाला आली. त्याआधी समाजात रूढ असलेल्या पारंपरिक कल्याणकारी मूल्यव्यवस्थेची मुले ही एक लाभार्थी असत. या कल्याणकारी तत्त्वांचे लाभार्थी ते कायदेशीर हक्कदार, हा बदल मूलभूत होता. सामाजिक न्याय, भेदभावापासून संरक्षण, समानता आणि सक्षमीकरण हे बालहक्कांच्या संकल्पनेमागील पायाभूत आधार होते. त्यांनी बालकल्याण हे केवळ दयाबुद्धी वा सद्‌भावना

यापलीकडे नेऊन ठेवले. बालहक्कविषयक या दृष्टिकोनाला आंतरराष्ट्रीय पातळीवर बंधनकारक कायद्याचे स्वरूप संयुक्त राष्ट्रांनी १९८९ साली दिले. भारताने १९९२ मध्ये या कायद्यावर शिक्कामोर्तब केले. या कायद्यातील बारकाव्यांबद्दल आणि मुलांच्या हक्कांबद्दल 'चाइल्ड राइटस् इन इंडिया' या पुस्तकात लेखिका आशा बाजपेयी यांनी विस्तृत विवेचन केले आहे.

बंगलोरच्या 'नॅशनल स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी'मध्ये काम करताना बालहक्कांसाठी कार्य करणाऱ्या अनेक सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांशी त्यांची ओळख झाली आणि त्यांचा या विषयातील रस वाढला. पुढे त्यांनी 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स' (टीस) आणि युनिसेफच्या मदतीने मुलांच्या हक्कांबाबत सखोल अभ्यास केला. या पुस्तकात भारतातील कायदे, खटले, निकाल, कायद्यांतील बदल, सामाजिक संस्थांच्या सहभाग आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर लहान मुलांसाठी बनविण्यात आलेल्या कायद्यांची चर्चा केली आहे. लहान मुले बऱ्याच बाबतीत परावलंबी असतात, अन्यायाचा प्रतिकार करण्याची त्यांची शक्तीही कमी असते. पण हीच मुले देशाचे भविष्य असल्याने त्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचे मानवी हक्कांसाठी लढणारे मानतात. म्हणूनच मुलांच्या हितरक्षणार्थ सशक्त कायद्यांची गरज आहे, यावर त्यांचा भर आहे.

साधारणत: अठरा वर्षांखालील व्यक्ती 'बाल' मानली जाते. मात्र विशिष्ट हेतूने केलेल्या कायद्यात, त्या कायद्यापुरत्या 'बाल' कोणाला म्हणावे याच्या वेगळ्या व्याख्या असू शकतात. भारतीय कायद्यातील काही व्याख्यांत ते १६ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. या सर्व व्याख्यांचे, कायद्यांचे मुलांसाठी बनविलेल्या योजनांचे सरकारतर्फे पुनरावलोकन होण्याची गरज असून हे कायदे सर्वसमावेशक बनावेत, असे मत लेखिकेने व्यक्त केले आहे.

लहान मुलांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष, अपंगत्व, लैंगिक शोषण, बाल गुन्हेगारी, मुलांचा बेकायदा व्यापार हे चिंतेचे विषय आहेत. त्या अनुषंगाने दाखल झालेले अनेक खटले, निवाडे, यांवर आकडेवारी आणि चित्राकृतींच्या सहाय्याने पुस्तकात सांगोपांग चर्चा केलेली आहे.

मूलभूत हक्कांचा विचार करताना लेखिकेने पालकत्व, आर्थिक पिळवणुकीविरोधात लढण्याचा हक्क, लैंगिक छळाविरोधात संरक्षणाचा हक्क, अल्पवयीन मुलांचे हक्क, विकासाचा हक्क, आरोग्याचा हक्क, पोषक वातावरण लाभण्याचा हक्क, भ्रणाचे हक्क, निवाऱ्याचा हक्क आणि जगण्याचा हक्क यांवर स्वतंत्र प्रकरणांत विवेचन केले आहे. मुलांचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक दर्जा सुधारण्याचा वसा हाती घेतलेल्या अनेक कार्यकर्त्यांच्या, संस्थांच्या भूमिकेतून या कायद्यांना मूर्त स्वरूप लाभले. पण त्यांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी बालकल्याण ही प्रत्येक स्तरातील व्यक्तीने वैयक्तिक जबाबदारी मानायला हवी, असा लेखिकेचा आग्रह आहे.

ग्रामीण भागात निरक्षरता आहे. दारिद्र्याच्या गर्तेत बुडालेली कुटुंबे पोटच्या पोरांकडेच निर्वाहाचे साधन म्हणून बघतात. मध्यप्रदेश, महाराष्ट्र, उत्तर प्रदेशातल्या अनेक जातीजमातींमध्ये अठरा वर्षाखालील मुले मुरळ्या, देवदासी, जोगिणी होतात. वेश्या-व्यवसायासाठी राज्यांतर्गत



किंवा देशाबाहेर मुले पाठविली जातात. रुढी, प्रथांचा पगडा तळागाळातल्या समाजावर इतका घट्ट असतो की मुलांना विकल्यावर त्यांचे पालक स्वत:च्या कृतीचे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे समर्थन करतात. बालहक्क कायद्यांची प्रथावी अंमलबजावणी होण्यासाठी मुळात त्यांच्याविषयी जागृती निर्माण होणे गरजेचे आहे. परदेशातील बालहक्क कायद्यांतील महत्त्वाच्या बाबी भारताने अंगीकारल्या. राष्ट्रीय बाल विकास आयोगाची स्थापना झाली. आयोगाची कार्यपद्धती, कायद्यांतील सुधारणा यांविषयी पुस्तकात उपयुक्त माहिती असल्याने बाल कल्याणासाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्था, कार्यकर्ते, विद्यार्थी, पोलिस, कायदा बनविणारे, सरकारी वकील, संशोधन आणि पालकांनाही ते संदर्भग्रंथ म्हणून अत्यंत उपयुक्त ठरेल.

(रेणुका प्रभाकर, म.टा.)

## * ३५हजार भारतीय चित्रपटांचा माहितीकोश

सर्व भारतीय भाषांमध्ये आजवर बनविलेल्या चित्रपटांचा माहितीकोश (डेटाबेस ऑफ इंडियन फिल्म्स) तयार होत आहे. त्यात सुमारे ३५ हजार चित्रपटांची माहिती असेल, अशी माहिती हा प्रकल्प राबविणारे के. हरिहरन यांनी दिली. हा प्रकल्प राबविण्यासाठी अमेरिकेतील पेनसिल्वानिया विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे.

श्री. हरिहरन चित्रपटनिर्माते आणि समीक्षक आहेत. पेनसिल्वानिया विद्यापीठात दक्षिण आशियाविषयक अभ्यास विभागात ते भारतीय चित्रपट विषयाचे अतिथी प्राध्यापक आहेत. विद्यापीठाच्या वेबसाईटवरच भारतीय चित्रपटांचा माहितीकोश उपलब्ध करून दिला जाणार आहे. तो कोणालाही मोफत पाहता येईल; त्यामुळे चित्रपटविषयक अभ्यासकांना एकाच ठिकाणी सर्व माहिती उपलब्ध होईल. श्री. हरिहरन म्हणाले, ''माहितीकोशात चित्रपटाचे नाव, निर्मिती वर्ष, निर्माता, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, प्रकार, कलाकार याबाबतची माहिती असेल. गेल्या ९० वर्षांत देशात हिंदीसह विविध प्रादेशिक भाषांत मिळून सुमारे ३५ हजार चित्रपट बनविले गेले. या सर्वांची एकत्रित माहिती कुठेच नाही. आपल्याकडे सेन्सॉर बोर्ड, चित्रपट संग्रहालये आहेत. खरे तर त्यांच्याकडे अशी माहिती असायला हवी. हिंदी, बंगाली चित्रपटांचे माहितीकोश उपलब्ध आहेत. त्याचबरोबर कन्नड आणि मराठी चित्रपटांचीही माहिती उपलब्ध आहे; मात्र अन्य भाषांतील चित्रपटांविषयी माहिती मिळविताना खूप अडचण येत आहे. गुजराती, ओरिया, आसामी, मणिपुरी चित्रपटांची काहीच माहिती उपलब्ध नाही. ही माहिती मिळविताना अनेक अडचणी येतात. मिळालेल्या माहितीची विश्वासार्हताही तपासता येत नाही.'

श्री. हरिहरन म्हणाले, ''गेल्या वर्षभरात मी सुमारे ३१ हजार चित्रपटांची माहिती गोळा केली आहे. त्यासाठी चेन्नई, बंगळूर, पुणे, तिरुवनंतपुरम आदी शहरांमध्ये सहा लोक नेमले आहेत. सध्या माहितीकोशात सन २००० पर्यंत प्रदर्शित झालेल्या चित्रपटांचाच समावेश करणार आहे. त्यातही फक्त चित्रपटच असतील, वृत्तचित्रे, लघुपट यांचा समावेश नसेल. दाक्षिणात्य राज्यांत एकच चित्रपट चार भाषांत डब होतो. त्यांचा विचार होणार नाही. मात्र 'रिमेक' चित्रपट समाविष्ट केले जातील. माहितीकोशामुळे चित्रपट नेमका

कोणत्या प्रदेशाशी संबंधित आहे, ते कळेल. पेनसिल्वानिया विद्यापीठाने प्रकल्पासाठी ४० हजार रुपये दिले आहेत. मात्र प्रत्यक्षात त्यापेक्षा जास्त खर्च झाला आहे.''

### * तुकाराम गाथा इंटरनेटवर

संत तुकारामांनी समाज प्रबोधनाचे व्रत अंगीकारून आपल्या अभंगांच्या गाथारूपी सन्मार्ग महाराष्ट्र व देशाच्या जनतेसमोर ठेवला. तुकाराम गाथा ही महाराष्ट्रातील खेडोपाड्यात ज्ञात आहे. हीच गाथा आता इंटरनेटच्या महाजालावर उपलब्ध झाली आहे.

www.tukaram.com या वेबसाईटवर मराठी भाषेत संत तुकाराम यांचे कार्य रेखाटलेले आहे. बॅरिस्टर बाबाजी गणेश परांजपे (१८८९-१९५३) हे संत तुकाराम चरित्रसंबंधीचे गाढे अभ्यासक. परांजपे कुटुंबाच्या पुढाकाराने तसेच पुणे येथील zensoft या सॉफ्टवेअर कंपनीतर्फे ही वेबसाईट बनवण्यात आली आहे. वेबसाईटवरील माहिती व गाथा हिंदी, इंग्रजी सोबत रशियन, फ्रेंच, इस्तंबुली, जर्मन व स्पॅनिश भाषेत अनुवादित स्वरूपात उपलब्ध आहे हे विशेष.

या वेबसाईटवर बाळगोपाळ, लेख, कलादालन, देहुदर्शन, गाथा, रंगभूमी, पुस्तक व ताजाकलम अशा लिंक्स आहेत. बाळगोपाळ विभागात संत तुकाराम यांच्या गोष्टी ॲनिमेशन स्वरूपात दर्शवल्या आहेत. राम बहादूर, पुरुषोत्तम देशपांडे, सदानंद मोरे तसेच इतर मान्यवरांचे लेख उपलब्ध आहेत. त्यातून संत तुकारामाच्या जीवनाचा, अभंगांचा परिचय होतो. कलादालन भागात वारकरी संप्रदायाची पंढरपूर यात्रा व आळंदीचे कलात्मक फोटो आकर्षकरीत्या ठेवले आहेत.

इंद्रायणी नदी, डोह, नदीवरील पूल, विठोबारखुमाई मंदिर, हनुमान मंदिर, पंचवाहन, महाद्वार, सिंहवृक्ष, इंद्रायणी मंदिर, डोहवृक्ष, डोहघाट, देहू मंदिर, पर्वत व स्तंभ तसेच प्रदक्षिणा मार्ग आदी फोटो दिलेले आहेत.

नाट्य-रंगभूमीवरील संत तुकारामविषयक भूमिकांची सचित्र माहितीही दर्शवली आहे. संत तुकारामांवरील प्रकाशित पुस्तकांची माहिती आहे.

मुख्य म्हणजे संत तुकारामांची गाथा ही जशीच्या तशी वेबसाईटवर उतरवण्यात आली आहे. विठोबा देवस्थान, श्री क्षेत्र देहू यांच्या सहकार्याने वेबसाईट निर्मात्यांना संत तुकारामाची गाथा उपलब्ध करून देण्यात आली. काही क्षणातच ही गाथा डाऊनलोड करून सामान्यांना तिच्या वाचनाचा लाभ घेता येऊ शकतो. मराठीत अप्रतिम ग्राफिक्स आणून आंतरराष्ट्रीय स्तरावरील वेबसाईट निर्मिती करून मराठी साहित्य विश्वात एक नवा पायंडा पाडण्यात वेबसाईट यशस्वी ठरली आहे.

### * म. श्री. दीक्षित यांच्या आत्मकथेचे प्रकाशन

साहित्याच्या क्षेत्रात म. श्री. दीक्षितांसारखी स्वत:ला झोकून देणारी माणसे निर्माण झाली नाहीत तर, सांस्कृतिक जीवन धोक्यात येऊ शकते, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रा. ग. जाधव यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यकर्ते म. श्री. दीक्षित यांनी लिहिलेल्या 'मी, म. श्री.' या आत्मकथेचे प्रकाशन प्रा. जाधव यांच्या हस्ते झाले.



आजच्या पिढीसाठी म. श्री. दीक्षित आदर्श आहेत, असे सांगून प्रा. जाधव म्हणाले की, म. श्री. सारखा सामान्य माणूस साहित्याचा, आत्मकथेचा विषय होऊ शकतो, ही या क्षेत्रातील क्रांतीच आहे. केवळ साहित्याच्या प्रेमासाठी चांगली नोकरी सोडून 'मसाप'ची अखंड सेवा करणारी माणसे दुर्मिळ होत चालली आहेत. म्हणूनच भविष्यात संस्थात्मक, घटनात्मक जीवन धोक्यात येण्याची भीती वाटते.

### * पुणे व लुझान विद्यापीठातर्फे फ्रेंचचे पुस्तक

परदेशी भाषा म्हणून फ्रेंच शिकणाऱ्यांसाठी पुणे विद्यापीठ आणि स्वित्झर्लंडमधील लुझान विद्यापीठ यांनी संयुक्तपणे क्रमिक पुस्तक तयार केले आहे.

या दोन्ही विद्यापीठांत शैक्षणिक करार झालेला आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'जुमलाज' नावाचे हे पुस्तक तयार करण्यात आले आहे. १५ जूनला लुझान येथे त्याचे प्रकाशन झाले. पुण्यातील रुपा लुकतुके आणि मंजिरी खांडेकर यांनी लेखन केले आहे. पुणे विद्यापीठाच्या प्रा. सुरेखा खेर आणि लुझान विद्यापीठातील प्रा. रेमंड काप्रे यांनी त्यासाठी मार्गदर्शन केले आहे.

''लुझान आणि पुणे या दोन्ही विद्यापीठांत फ्रेंच ही परदेशी भाषा म्हणून शिकविली जाते. त्यामुळे या अध्यापनाचा उपयोग नवशिक्यांना होईल.

### * 'माझी वाटचाल'चे प्रकाशन

'माझी वाटचाल' या ग. प्र. प्रधान यांच्या आत्मकथनात्मक पुस्तकाचे प्रकाशन दि.११ जून रोजी झाले. 'माणसांमधून स्फूर्ती घेत माणूस म्हणून घडणाऱ्याची ही कथा आहे. हा सारा माणूस घडवण्याचा दीपोत्सव आहे. ज्याची घडण्याची इच्छा आहे, त्याला इथं प्रकाश मिळेल,' असे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. रा. ग. जाधव यांनी सांगितले.

प्रा. जाधव म्हणाले, ''एका संस्कारक्षम माणसाच्या घडणीची ही कथा आहे. चारित्र्य व चरित्र यांचा संबंध कसा जोडायचा, याचा प्रश्न पडावा अशा या काळात हे पुस्तक एका वस्तुपाठासारखे आहे. स्वत: घडले पाहिजे ही आकांक्षा व घडवणारी माणसे - परिस्थिती यातून हे आत्मकथनसदृश शिल्प तयार झाले आहे. माणूस घडवणे व जीवनाचे अगत्य मानणे, ही सानेगुरुजींचीच परंपरा आहे.''

डॉ. अरुण टिकेकर म्हणाले, ''या पुस्तकात आत्मसमर्थन नाही, की आत्मप्रशंसा नाही. तो प्रधान सरांचा स्वभावही नाही. ही त्यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्यांविषयीची संस्मरणे. साध्या, अनलंकृत भाषेत छोट्या उदाहरणांमधून त्यांनी व्यक्तिचित्रे निर्माण केली आहेत. महाराष्ट्राच्या समाजवादी चळवळीतील ते शेवटचे शिलेदार आहेत. या चळवळीने काळाबरोबर बदलण्याचे नाकारले त्यामुळेही ही चळवळ मागे पडली.''

### * सेन यांना दोषी ठरवून चुकीचा पायंडा पाडू नये

''महाराष्ट्रातील सत्तारूढ अथवा विरोधी नेत्यांनी श्री. सुरेंद्रनाथ सेन यांच्या 'मराठ्यांची प्रशासन व्यवस्था' या ग्रंथासंबंधी बोलताना चुकीचा पायंडा पडेल, असे काही करू नये.'' असे आवाहन ज्येष्ठ विचारवंतांनी एका पत्रकाद्वारे केले.

महात्मा जोतिराव फुले समता प्रतिष्ठानतर्फे याबाबतचे पत्रक प्रसिद्धीला देण्यात आले. त्यावर ताहेर पुनावाला, उत्तमराव भोईटे, विलास वाघ, विद्या बाळ, गो.त्र्यं.कुलकर्णी, विश्वासराव नाईकनवरे यांच्या सह्या आहेत. या पत्रकात ते म्हणतात,''श्री. सेन यांच्या व्यासंगाबद्दल आदर बाळगला पाहिजे. राजकीय खेळीसाठी त्यांना दोषी धरण्याने चुकीचा पायंडा पडेल. अलीकडच्या काळात जेम्स लेन यांनी 'शिवाजी : द हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया' या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांविषयी काही विधाने केली. अशा प्रकारची विधाने यापूर्वीही प्रसिद्ध झाली आहेत. अशा विधानांचा श्री. सेन यांनी समर्थपणे समाचार घेतला असून, शंकेखोरांच्या युक्तिवादाचे खंडन केले आहे. खंडन करताना मूळ विधाने उद्धृत केली आहेत. प्रतिपक्षाचे म्हणणे खोडून काढताना हीच पद्धती अवलंबली जाते. मोघमपणा चालत नाही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, विरोधी पक्षनेते, लोकप्रतिनिधी आदींनी या संदर्भात भाष्य करताना किमान भान सांभाळावे. श्री. सेन यांनी सखोल अभ्यास करून 'मराठ्यांची प्रशासन पद्धती' हा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ म्हणजे मौलिक ठेवा आहे. ख्यातनाम इतिहास संशोधक वि. का. राजवाडे, श्री. पिसुर्लेकर यांसारख्या नामवंत संशोधकांच्या लिखाणाचा श्री. सेन यांनी आधार घेतला आहे.''

## * 'भारतीय संस्कृती त्रिकालाबाधित विश्व संस्कृती'

परिवर्तनशीलतेमुळे शतकानुशतके टिकून राहिलेली भारतीय संस्कृती ही त्रिकालाबाधित विश्वसंस्कृती आहे. भारतीय धर्मातील अनिष्ट चालीरीती कालमानपरत्वे बदलत गेल्या. मात्र विश्वसंस्कृतीमान्य असा अध्यात्मावर आधारित भारतीय संस्कृतीचा पिंड कायम राहिला आहे. त्याची जाणीव तरुण पिढीपर्यंत पोचवायला हवी. अशी अपेक्षा भांडारकर संशोधन संस्थेच्या मानद सचिव सरोजा भाटे यांनी व्यक्त केली.

विश्व हिंदू परिषदेच्या मध्य विभागाच्या वतीने, ज्येष्ठ लेखक चं.प.भिशीकर लिखित 'ओळख हिंदू धर्माची आणि तत्वज्ञानाची' या पुस्तकाचे प्रकाशन भाटे यांच्या हस्ते करण्यात आले. ख्यातनाम संस्कृत पंडित कृष्णशास्त्री अध्यक्षस्थानी होते. संघटनेचे अध्यक्ष हसमुख पटेल, उपाध्यक्ष डॉ. धनंजय रजपूत, महिला प्रमुख शुभदा काशीकर आदी यावेळी उपस्थित होते.

## * मनोहर जोशी यांच्या 'सर स्पीक्स'चे प्रकाशन

'लोकसभेत आज माझ्या नव्या डावाची ज्या पद्धतीने सुरुवात झाली, ती बघता मला मनोहर जोशी यांचा सल्ला घेणे आवश्यक ठरणार आहे.' असा नर्मविनोद करीत नवनिर्वाचित लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांनी लोकसभेचे माजी अध्यक्ष मनोहर जोशी यांच्या 'सर स्पीक्स' या निवडक भाषणांच्या पुस्तकाचे प्रकाशन केले.

अध्यक्षांच्या कक्षात छोटेखानी समारंभात बोलताना संसदीय राजकारणाच्या विद्यार्थ्याला मनोहर जोशी यांनी चार दशकांच्या राजकीय प्रवासात विविध विषयांवर केलेल्या भाषणांचे संदर्भ अतिशय उपयुक्त ठरतील, असे मत चटर्जी यांनी व्यक्त केले. लोकसभा अध्यक्ष झाल्यानंतर सोमनाथ चटर्जी यांना पहिल्याच कार्यक्रमात आपल्या पुस्तकाचे प्रकाशन करावे लागणे हे माझे भाग्य आहे; असे उद्गार मनोहर जोशी यांनी काढले.



माजी लोकसभा अध्यक्षाचे पुस्तक एवढ्या झटपट प्रकाशित केल्याबद्दल त्यांनी लोकसभा सचिवालयाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

लोकसभेचे सरचिटणीस जी.सी.मल्होत्रा यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी लोकसभेचे संयुक्त सचिव आनंद कुलकर्णी, रत्नलाल शाली यांच्यासह लोकसभा सचिवालयाचे कर्मचारी, रा.मो.हेजीब तसेच अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते

## * उत्तम साहित्यिक होण्यासाठी शब्दसंपत्तीची गरज - अख्तर

उत्तम लेखक किंवा कवी होण्यासाठी भरपूर वाचन व शब्दसंपत्ती असणे आवश्यक आहे, असे उद्गार ख्यातनाम कवी व गीतकार जावेद अख्तर यांनी काढले.

मुंबई ऑक्सफर्ड बुक स्टोअर व दि ओपन थिएटर यांनी संयुक्तरीत्या नवोदित लेखकांना आपले साहित्य श्रोत्यांसमोर मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे म्हणून 'चा रायटर्स' हे एक अनोखे फोरम २ जूनपासून सुरू करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जावेद अख्तर उपस्थित होते. नवीन लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी मी आलो होतो; परंतु त्यांचे साहित्य इतके अप्रतिम आहे की माझ्याजवळ त्यांना सांगण्यासाठी काहीच नाही, अशा शब्दांत जावेद अख्तर यांनी उपस्थित लेखकांची स्तुती केली.

## * राजेश देशपांडे - 'कु. गंगुबाई नॉन मॅट्रिक'चा निर्माता

खूप साधंसरळ असलं की, गल्लत होते ! यश मिळतं... पण जरा उशिरानेच ! फक्त ज्या वयात ज्या गोष्टी पाहिजे असतात, त्या वेळी त्या मिळत नाहीत. उत्साह राहतो, पण जोश राहत नाही. हा आवेश टिकवतात, ते खरे कलंदर ! खेड्यापाड्यातून येऊन मुंबईच्या मायानगरीत स्वत:चं अस्तित्व टिकवणं आणि मजल-दर मजल करत अवॉर्डवर नाव कोरणं, अशा वहिवाटेचा पांथस्थ म्हणजे राजेश देशपांडे ! मुंबईच्या मायानगरीनं त्याला भुलवलं... क्रिकेटपटू व्हायचं स्वप्न घेऊन राजापूर तालुक्यातला राजेश मुंबईत आला. मात्र नियतीच्या मनात काही औरच होतं...

क्रिकेट राहिलं दूरच. काही मित्रांमुळे नाटक आवडू लागलं. हळूहळू पाय वळू लागले ते सन्मित्र या नाट्यसंस्थेच्या दिशेने! वामन केंद्रेंच्या 'झुलवा'मधल्या मॉब सीनमधल्या एंट्रींनंही तो सुखावला होता. त्यानंतर 'एमव्हीएलयू' कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.

सव्वा सहा फूट उंची, डोळ्यात चमक, तरतरीत नाक आणि देखणा या कॅटेगरीत नोंद करता येईल, असं बरंच काही त्याच्या गाठीशी होतं. पण त्यापेक्षा महत्त्वाचा होता तो आत्मविश्वास! इतरांनी नाऊमेद करण्याच्या या दिवसांत त्याचीच साथसोबत त्याला होती. या दिवसांत एका छान मित्राशी सूर जुळले तो म्हणजे वीरेंद्र प्रधान! मग ओघाने शिवाजी पार्कमधल्या इराण्याकडे बसून एखाद्या स्क्रिप्टवर चर्चा करण्यासारख्या गोष्टी घडू लागल्या. इथंच त्याने 'ब्लँक कॉल' नावाचा 'थॉट डेव्हलप' केला. एकांकिका रूपात मांडला आणि रंगभूमीवर आलं ते 'हे वयच असं असतं' या नावाने!

त्यावेळी अवघ्या आठशे रुपयांची नोकरी हीच राजेशची संपत्ती! दुपारी तीन केळी आणि रात्री स्वस्तातली पावभाजी खाऊन मुंबईत राहिला. मुंबईनं खऱ्या अर्थानं जगण्याचे नियम शिकवले. पण प्रामाणिकपणा आणि सचोटी या दोन्ही गोष्टींनी आपण मुंबईत

तगलो, असं तो सांगतो आर्थिक अडचणींमुळे नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाला जायचं केवळ स्वप्नच राहिलं.

या दिवसांत 'आम्ही आलो रे'सारखं नाटक लिहिलं. तोपर्यंत ॲक्टिंग करण्यापर्यंतच सारा खेळ सीमित होता. आता खऱ्या अर्थाने गंमत सुरू झाली होती. मग सीरियल्सचं पर्व सुरू झालं. पण नाळ नाटकात पुरल्याचं राजेश मान्य करतो. रंगभूमीवर आजही कस लागतो. 'कुमारी गंगुबाई नॉन मॅट्रिक'साठी रापा ॲवॉर्ड मिळविण्याचा मान पटकावणाऱ्या राजेशच्या हातून मालिकांच्या धबडग्यात ही 'पुन्हा पुन्हा प्रपंच', 'तेरे घरच्या समोर', 'मृण्मयी' सारख्या कसदार संहिता त्याच्या हातून लिहिल्या जातात.

राजेश हा आपल्या प्रत्येक कलाकृतीबाबत चोखंदळ आहे. केवळ मालिकांच्या गुंत्यात अडकून पडायचं नाही. नवनव्या पर्यायातून स्वत:ला आजमावत राहायचा खेळ तो नित्यनेमाने खेळतोय! म्हणूनच पुन्हा एकदा फ्रेश होण्यासाठी नाटक करायच्या विचारात आहे. तो 'विन'चा घोडा है... लंबी रेस का!

### * 'विठाबाईंचे चरित्र शेक्सपिअरच्या शोकांतिकेत शोभणारे'

तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर या लोककला परंपरेतील थोर कलावती होत्या. उच्चवर्णीयांना ज्या काळात लोककलेशी बिनदिक्कतपणे भिडणे शक्य नव्हते, त्या काळात त्यांनी आपले वडीलभाऊ नारायणगावकर यांच्या तमाशाची परंपरा पुढे चालविल्यामुळेच आज तमाशाला प्रतिष्ठा मिळू शकली, असे प्रतिपादन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

'तमाशा : विठाबाईच्या आयुष्याच्या' या योगीराज बागूललिखित पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. मुंबईच्या परळ येथील डॉ. शिरोडकर स्मारक सभागृहात हा समारंभ आयोजित करण्यात आला.

या वेळी बोलताना मुख्यमंत्री पुढे म्हणाले, काही पुस्तके इतिहास बनून राहतात. विठाबाईंच्या जीवनाचा पट उलगडणारे हे पुस्तकही असेच मराठी साहित्याच्या इतिहासात स्वतंत्र ठसा उमटविणारे ठरेल. या पुस्तकात १९३५ पासूनचा तमाशाचा इतिहास सांगितला गेला आहे. शेक्सपिअरने लिहिलेल्या शोकांतिकेच्या मालिकेत जमा व्हावे, असे हे चरित्र बागूल यांच्या ओघवत्या शैलीमुळे विठाबाईंचे आत्मचरित्रच वाटावे असे आहे असे शिंदे यांनी सांगितले.

या पुस्तकातून विठाबाईंनी भोगलेलं आयुष्य उलगडेल, शिवाय गावकुसाबाहेरचं जिणं काय असतं, हेदेखील लोकांना कळेल. विठाबाईंच्या नारायणगावमध्ये लवकरच पहिला तमाशा महोत्सव आयोजित करण्यात येईल. या महोत्सवात एका तमाशा कलाकाराला विठाबाई नारायणगावकरांच्या नावाने शासनातर्फे पुरस्कार देण्यात येईल, अशी घोषणाही या वेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

नारायणगावला विठाबाईंचे स्मारक म्हणून जी तमाशा कलावंतांच्या मुलांसाठी आश्रमशाळा काढण्यात येणार आहे, त्यासाठी शासनाने दोन एकर जागा दिलेली आहे. वृद्ध कलावंतांना त्यांच्या मानधनासाठी आता मुंबईपर्यंत पायपीट करण्याची गरज नाही. जिल्हा पातळीवर एक समिती गठित करून मानधनाची व्यवस्था लावण्यासाठी अध्यादेश आढण्यात आला असल्याची माहिती त्यांनी आपल्या भाषणात दिली.



विठाबाई म्हणजे आमची त्या काळची माधुरी दीक्षित होती. पेट्रोमॅक्सच्या उजेडात कनातीमध्ये चालणारा हा तमाशा मनोरंजनाचे एकमेव साधन होते. लोककलेसाठी आयुष्य वाहून घेणाऱ्या या कलेच्या वारसदारांना आजही न्याय मिळालेला नाही. अजूनही अनेक नावे पडद्यामागेच राहिली आहेत, अशी खंत वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांनी या वेळी बोलताना व्यक्त केली.

### * अनुराधा गुरव विशेषांक

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या एक लेखिका प्रा. अनुराधा गुरव यांच्या साठीनिमित्त द. म. साहित्य पत्रिकेने खास अंक प्रकाशित केला आहे. प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी त्याचे संपादन केले आहे. प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, प्रा. डॉ. जे. बी. शिंदे, काका विधाते, डॉ. लीला पाटील, ऋजुता गुरव, प्रा. मंदा कदम, डॉ. राजलक्ष्मी बर्वे तसेच तृप्ती नोरूळकर, कर्नल रविकांत जाधव यांचे लेख अंकात आहेत.

### * 'तत्कालीन'चे प्रकाशन

'निरंजन उजगरे यांची कविता नितळ, मोकळी, सडेतोड आणि चित्रदर्शी असून, ह्या कवीला आत्मभान असलं तरी तो आत्ममग्न नाही' असे उद्‌गार सुप्रसिद्ध साहित्यिक रत्नाकर मतकरी ह्यांनी 'तत्कालीन'कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना ४ जून रोजी दादर येथे गावस्कर सभागृहात काढले. या कविता निवडक वाचकांपुरत्याच मर्यादित न राहता, त्यांचे अंश... शाळा-कॉलेजांच्या भित्तीपत्रकांपर्यंत जायला हवेत' असेही ते म्हणाले.

कवी सतीश काळसेकर ह्यांनी म्हटले, या कवितेला करुणेचा आणि मायेचा स्पर्श झाला आहे. राजकीय भाष्यकविताकार रामदास फुटाणे ह्यांनी ही कविता या दशकाचे प्रतिनिधित्व करणारी आहे; तसेच तिच्यातून दिसणारी राजकीय जाणीवही अस्वस्थ करणारी आहे असे म्हटले.

### * निबंध स्पर्धा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार आणि कार्य या विषयावरील निबंधस्पर्धा महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेने जाहीर केली आहे. शब्दमर्यादा - ४ ते ५ हजार शब्द. मुदत - ३१ ऑगस्ट २००४. पत्ता - प्रा. शर्मिला वीरकर, बी-२, ७०४ लोकमीलन, चांदिवली, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०७२. फोन - २८४७४३८०. पहिल्या दोन निबंधांना पाचशे व तीनशे रुपयांचे पुरस्कार देण्यात येतील.

### * जैन साहित्य चर्चा

सांगली येथे ३० मे रोजी मराठी जैन साहित्यावर एक चर्चासत्र घेण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी न्यायाधीश सी. टी. पाटील हे होते. 'दानचिंतामणी अत्तिमब्बे' या पुस्तकाचे प्रकाशनही यावेळी झाले. कलिंग सम्राट खरवेल, शासन (समकालीन जैन कथा-भाग ६), आणि अत्तिमब्बे या पुस्तकांवर यावेळी चर्चा झाली. त्या चर्चेत प्रा. श्रीधर हेरवाडे, डॉ. नलिनी जोशी, श्रेणिक अन्नदाते, रवींद्र बेडकीहाळ प्रभृतींनी भाग घेतला. सुमेरू प्रकाशनच्या सौ. सुरेखा शहा लिखित पुत्रवती या कादंबरीवरही डॉ. रवींद्र ठाकूर, नीलम माणगावे यांनी आपले विचार मांडले. जैन व मराठी संस्कृतीचा तौलनिक अभ्यास करण्याची गरज आहे असे डॉ. बाबूराव गुरव यांनी म्हटले. ❐


## लोकप्रिय लेखकांच्या काही गाजलेल्या कादंबऱ्या

| | | |
|---|---|---|
| स्वामी | रणजित देसाई | १४०/- |
| श्रीमानयोगी | रणजित देसाई | ३००/- |
| अभोगी | रणजित देसाई | १५०/- |
| राधेय | रणजित देसाई | ११०/- |
| पावनखिंड | रणजित देसाई | १००/- |
| माझा गाव | रणजित देसाई | १५०/- |
| समिधा | रणजित देसाई | १००/- |
| बारी | रणजित देसाई | १२०/- |
| राजा रविवर्मा | रणजित देसाई | १८०/- |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ८०/- |
| शेकरा | रणजित देसाई | ६०/- |
| लक्ष्यवेध | रणजित देसाई | ९०/- |
| पहिले प्रेम | वि. स. खांडेकर | ९०/- |
| जळलेला मोहोर | वि. स. खांडेकर | १००/- |
| नवी स्त्री | वि. स. खांडेकर | १००/- |
| माऊली | आनंद यादव | ६०/- |
| कलेचे कातडे | आनंद यादव | २००/- |
| ठिकरी | व. पु. काळे | ६०/- |
| तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७०/- |
| ही वाट एकटीची | व. पु. काळे | १२०/- |
| पार्टनर | व. पु. काळे | १२०/- |
| कथा ही दिवावादळाची (अनु.) | वि. स. वाळिंबे | १००/- |
| लज्जा : तसलिमा नासरिन | अनु.लीना सोहोनी | १२५/- |
| फेरा : तसलिमा नासरिन | अनु. मृणालिनी गडकरी | ७०/- |
| आंधळी: कॅथरीन पियर्स | शांता शेळके | १००/- |
| चौघीजणी: लुइसा मे अल्कॉट | शांता शेळके | ३००/- |
| पर्व : एस. एल. भैरप्पा | उमा कुलकर्णी | ३००/- |
| परिशोध : एस. एल. भैरप्पा | उमा कुलकर्णी | १००/- |
| चिदंबर रहस्य : के.पी.पूर्णचंद्र तेजस्वी | उमा कुलकर्णी | १२५/- |
| तंतू : एस. एल. भैरप्पा | उमा कुलकर्णी | ४५०/- |
| वंशवृक्ष : एस. एल. भैरप्पा | उमा कुलकर्णी | १७०/- |
| डोंगराएवढा : शिवराम कारंत | उमा कुलकर्णी | ९०/- |
| अंतराळ : शांतिनाथ देसाई | उमा कुलकर्णी | १००/- |
| महाश्वेता : सुधा मूर्ती | उमा कुलकर्णी | १२०/- |
| अवस्था : यु. आर. अनंतमूर्ती | उमा कुलकर्णी | ११०/- |



## द रेनमेकर

लेखक : जॉन ग्रिशॅम
अनु : अनिल काळे




**एका नवथर वकिलाने अवाढव्य विमा कंपनीशी दिलेला एकाकी पण नेत्रदीपक लढा**

अमेरिकन न्यायव्यवस्थेचा आणि न्यायालयातील कामकाजाच्या बारकाव्यांवर आधारित थरारकथांच्या द्वारे जॉन ग्रिशॅमने बेस्टसेलर लेखकांमध्ये आपले स्थान गेली दोन दशके अबाधित ठेवले आहे.

कथानकाची उत्कंठावर्धक चिरेबंदी बांधणी हे ग्रिशॅमचे वैशिष्ट्य. सतत नवे धक्के देणारे प्रसंग आणि व्यक्तिरेखांच्या मानसिक गुंतागुंतीमुळे त्यात भरत जाणारे रंग यामुळे कथाप्रेमी वाचक जॉन ग्रिशॅमच्या कादंबऱ्यांमध्ये रमत जातो; कादंबरी वाचून पूर्ण केल्याशिवाय ती सोडायचे त्याच्या जीवावर येते.

स्वत: कायद्याचा पदवीधर आणि वकिलीतील अनुभव यामुळे न्यायालयीन कार्यपद्धतीचा जवळून परिचय असलेला जॉन ग्रिशॅम कायद्यातील बारकाव्यांचा कथानकाचा डोलारा उभा करताना चातुर्यपूर्ण वापर करतो. मिसिसिपीच्या विधानसभेचा सदस्य म्हणूनही त्याची १९८३ मध्ये निवड झाली. त्यामुळे राजकारणाच्या विविध पैलूंचाही त्याला प्रत्यक्ष मागोवा घेता आला.

एका आफ्रिकन अमेरिकन म्हणजे कृष्णवर्णीय - व्यक्तीवर आपल्या मुलीवर बलात्कार करण्याचा आणि दोन श्वेतवर्णीय व्यक्तींची हत्या केल्याचा आरोप ठेवून खटला भरला जातो; या घटनेवर 'ए टाइम टू किल' या त्याच्या पहिल्या थरारकथेची उभारणी झाली आहे. (१९८९) परंतु या थरारकथेला आरंभी वाचकांचा फारसा प्रतिसाद मिळाला नाही. १९९१ मध्ये त्याची दुसरी थरारकथा प्रसिद्ध झाली. आपण काम करीत असलेल्या सॉलिसिटरच्या फर्ममधील भ्रष्टाचाराची माहिती मिळाल्यावर एक उमदेवारी करणारा नवखा वकील त्या फर्मचे सत्य स्वरूप चव्हाट्यावर आणण्याचा प्रयत्न करतो अशी या थरारकथेची मध्यवर्ती कल्पना आहे. या थरारकथेवरील चित्रपट गाजला आणि वकिली सोडून, आमदारकी सोडून जॉन ग्रिशॅमने लेखनालाच पूर्ण वेळ वाहून घेण्याचे ठरवले. दि पेलिकन ब्रीफ (१९९३), दि क्लाएन्ट (१९९३), दि चेंबर (१९९४), दि रेनमेकर (१९९५), दि रन आवे ज्युरी (१९९६), दि पार्टनर (१९९७), दि स्ट्रीट लॉयर (१९९८), दि टेस्टॅमेंट (१९९९), दि ब्रदर्न (२०००), ए पेन्टेड हाऊस (२००१) या त्याच्या कादंबऱ्याही

सतत बेस्टसेलर लिस्टमध्ये झळकला.

द पेलिकन ब्रीफ, द क्लायंट या त्याच्या कादंबऱ्यांचे अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले आहेत. आता द रेनमेकरचा अनुवाद बाजारात येत आहे. ही कादंबरी म्हणजे कोर्टरूम ड्रामा आहे; आणि अमेरिकेतील न्यायपद्धती भारतीय न्यायपद्धतीपेक्षा भिन्न आहे हे लक्षात घेऊन अनिल काळे यांनी हा अनुवाद केला आहे.

या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना ही सोपी सुटसुटीत आहे; पण तिच्यावर उभारलेला कथानकाचा डोलारा चांगलाच गुंतागुंतीचा आहे.

वैद्यकीय विमा उतरविणारी दि ग्रेट बेनिफिट ही कंपनी, विमाधारकांचे रास्त क्लेमही नाकारण्याचे धोरण राबवते. वेळीच क्लेम न मिळाल्याने ल्युकेमिया झालेल्या डॉनी ब्लॅक या १८ वर्षाच्या तरुणावर बोनमॅरोचा उपचार वेळेवर होऊ शकत नाही; आणि त्याचे मरण अटळ ठरते. कायद्याची पदवी नव्यानेच घेतलेला एक तरुण वकील रुडी बेलर हा त्याची केस हाती घेतो आणि इन्शुरन्स कंपनीला नोटिस पाठवतो. त्या कंपनीतर्फे एक बडी सॉलिसिटरची फर्म बचावाचे काम पाहते. तिचा प्रमुख लिओ एफ. ड्रमंड साठ वर्षांचा अनुभवी वकील असून बचावासाठी तो आणखी पाच वकिलांचे सहाय्य घेतो. सामदामदंडभेद हे सर्व मार्ग बेदिक्कतपणे हाताळण्यात या वकिली फर्मचा आणि इन्शुरन्स कंपनीचाही हातखंडा असतो. काही रक्कम देऊन कोर्टाबाहेरचा हा खटला तडजोडीने मिटवण्याचा प्रयत्नही होतो. परंतु डॉनीची आई या इन्शुरन्स कंपनीला धडा शिकवायचा, खटला चालवायचा म्हणून आग्रही असते... हा खटला चालतो आणि डॉनीला प्रत्यक्ष नुकसान भरपाई म्हणून दोन लाख डॉलर्स आणि अप्रत्यक्ष भरपाई म्हणून पाच कोटी डॉलर्स देण्याचा निर्णय ज्युरी देतात. परंतु दि ग्रेट बेनिफिट ही इन्शुरन्स कंपनी दिवाळे जाहीर करून ही रक्कम देण्याचे टाळते.. कारण या निकालाने निरनिराळ्या राज्यात या कंपनीच्या विरुद्ध खटल्यांचे पेवच फुटते.

**वैद्यकीय विमा संस्थांच्या द्वारे सर्वसामान्य विमाधारकांची होणारी फसवणूक व लुबाडणूक हे या थरारकथेचे सूत्र आहे.**

वैद्यकीय विमा संस्थांच्या द्वारे सर्वसामान्य विमाधारकांची होणारी फसवणूक व लुबाडणूक हे या थरारकथेचे सूत्र आहे.

आता ही फसवणूक कशी होते हे सिद्ध करणे ही बाब सोपी नसते. त्यासाठी कागदपत्रे गोळा करावी लागतात. कंपनीच्या कार्यपद्धतीची माहिती गुप्तपणे मिळवावी लागते. या कंपनीविरुद्ध भरल्या गेलेल्या खटल्यांची माहिती काढावी लागते; क्लेम नाकारण्याच्या तिच्या व्यूहरचनेची गुपिते जाणून घ्यावी लागतात. त्यासाठी या कंपनीने लुबाडलेल्या विमाधारकांच्या आणि माजी कर्मचाऱ्यांच्या गाठीभेटी घ्याव्या लागतात. त्या कंपनीच्या आर्थिक व्यवहाराची व्याप्ती जाणून घ्यावी लागते. या सर्व प्रकारांबाबत कंपनी



अत्यंत गुप्तता पाळत असते; आणि तिच्या अनेक अधिकाऱ्यांनाही अंधारात ठेवून तिचे मुख्य सूत्रधार काम करीत असतात. हे सगळे पुराव्यानिशी सिद्ध करण्यासाठी रुडी बेलर या नवशिक्या वकीलाला आपले सर्व कौशल्य पणाला लावावे लागते. या इन्शुरन्स कंपनीने आणि सॉलिसिटर फर्मने न्यायाधीशांनाही विकत घेतलेले असते; आणि गरीब विमाधारकांना शेवटपर्यंत खटला लढवणे हे जवळजवळ अशक्य करून ठेवलेले असते. कोणी अखेरपर्यंत खटला लढवलाच तर त्याला अल्पशी भरपाई देऊन केस निकाली काढण्याबाबत हे न्यायाधीश आपली भूमिका निष्ठेने बजावतात. त्यामुळे विमा कंपनीला अमाप फायदा होत असतो. जेव्हा मेंफिस कोर्टातील कंपनीच्या मर्जीतला न्यायाधीश अचानक मृत्यू पावतो, तेव्हा कृष्णवर्णीय न्यायमूर्ती किप्लर यांची तेथे नियुक्ती होते. विमा कंपनी ही केस फेडरल कोर्टाकडे वर्ग करण्याचा आग्रह धरते; पण न्यायमूर्ती तो आग्रह फेटाळून लावतात. केस किप्लरपुढेच चालते. आधी तडजोडीचा प्रयत्न होतो. त्यातही कंपनी काही चलाखी करू पाहते; आणि बचावपक्षाचा वकील ड्रमंड कंपनीला त्याबद्दल न कळवताच खटला पुढे चालू ठेवण्याचा पवित्रा घेतो.

**एकेक तपशील काटेकोरपणे उभा करीन, या संपूर्ण खटल्यातील बारीकसारीक साक्षीपुरावा व युक्तिवाद बिनतोड व्हावा म्हणून जॉन ग्रिशॉमने घेतलेली दक्षता खरोखरच थक्क करते.**

रुडी बेलर ज्या प्रकारे विमा कंपनीच्या गैरव्यवहारांची माहिती मिळवतो; ज्या प्रकारे कोर्टात साक्षीपुरावे उभे करतो, त्यातून त्याचे कौशल्य प्रकट होते. सुदैवाने न्यायमूर्ती किप्लर यांचीही सहानुभूती त्याच्या बाजूने असते; त्यामुळे या न्यायालयीन डावपेचांना निर्णायक महत्त्व लाभते.

ज्युरीची निवड करताना न्या. किप्लर सुमारे १०० व्यक्तींची यादी देतात. त्यातून आपल्या सोयीची नावे निवडण्याची मुभा आहे. रुडी त्याबाबत जी व्यूहरचना करतो, ती त्याचा फोन चोरून ऐकणाऱ्या ड्रमंडची पार दैना उडवते. कोर्टात त्याला 'मी फोन चोरून ऐकत होतो' हे उघड करता येत नाही; आणि या व्यक्तींबद्दलची माहिती कशी मिळाली हे स्पष्ट सांगता येत नाही. त्यामुळे रुडी आपल्याला समजून घेऊ शकणाऱ्या ज्युरीची निवड करण्यात बाजी मारतो. कोर्टाच्या कामकाजाच्या पद्धतीचा फायदा तो नव्याने वकिली करीत असूनही वरचेवर उठवतो; आणि साक्षीदारांनाही अचानक आणून किंवा वेगळ्या क्रमाने आणून प्रतिपक्षाची भंबेरी उडवतो. साक्षी शक्य तेवढ्या लांबवत राहून, ज्युरींना गोंधळात टाकण्याचे बचाव पक्षाचे धोरण रुडी बेलर अगदी निष्प्रभ ठरवतो; आणि बचाव पक्षाच्या साक्षीदारांची दे माय धरणी ठाय अशी अवस्था करून सोडतो.

अशा खटल्यात ज्युरी साधारणतः लाख दोन लाख डॉलर्सचा क्लेम मंजूर करतात; त्याशिवाय कंपनीला दहशत बसावी, पुन्हा असे गैरप्रकार करण्याचा मोह होऊ नये म्हणून रुडी एक कोटींची भरपाई मागणे कसे इष्ट आहे याबद्दलचा युक्तिवाद ज्युरीपुढे करतो.

ज्युरी त्या युक्तिवादाने इतके भारावतात की, एका कोटीऐवजी पाच कोटी डॉलर्सच्या भरपाईची शिफारस करतात आणि त्यामुळे अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात जास्त दंडात्मक नुकसानभरपाईचा खटला म्हणून या प्रकरणाला अमाप प्रसिद्धी मिळते.

वकिलांच्या फर्मचे कामकाज कसे चालते, त्यात नोकरीला ठेवताना काय गडबडगुंडा चालतो, दुसऱ्याची केस आपल्याकडे आणण्याचे शहप्रतिशह कसे खेळले जातात, कमी मोबदल्यात नवीन वकिलांना कसे राबण्यात येते वगैरे प्रकारांचेही तपशील वेगवेगळ्या घटनांद्वारे पुढे येत राहतात.

रुडीजवळ असलेली डॉनी रे ब्लॅकची केस आपल्याला मिळावी यासाठी त्याला नोकरीचे आमिष दाखवून, केस हाती आल्यावर त्याला डच्चू देण्याचा प्रयत्नही वकील बॅरी लँकास्टर करतो. तर गुन्हेगारांना संरक्षण देऊन, जामीन मिळवून देणारे ब्रूझरसारखे वकीलही येथे भेटतात. एखादा अपघात झाला की संबंधित व्यक्तीला गाठून, तुला भरपूर नुकसान भरपाई मिळवून देतो असे सांगून वकीलपत्रावर त्याच्या सह्या सर्वात अगोदर घेण्याची धावपळ अनेक वकीलांना करावी लागते. त्यासाठी हॉस्पिटलच्या कँटिनमध्ये काही होतकरू वकील ठिय्या देऊन बसलेले असतात. अनेक मोठे वकील कोर्टात तेच ते युक्तिवाद पुन:पुन्हा करून बराच वेळ घालवतात; कारण त्यांना तासावर फी मिळत असते. ड्रमंडच्या अशा प्रयत्नांना न्या. किप्लर अधूनमधून बरोबर ब्रेक लावतात. संभाव्य साक्षीदारांना नोकरीतून काढून टाकून, त्यांचा ठावठिकाणा लागत नाही अशीही खेळी ग्रेट बेनिफिट लाइफ इन्शुरन्स कंपनी करते; पण न्या. किप्लर व रुडी बेकर हे त्या कंपनीलाही नेमके पेचात पकडून हे प्रयत्न निष्प्रभ ठरवतात.

**कोर्टात प्रत्येक गोष्ट सिद्ध करावी लागते; केवळ तर्काने वेळ मारून नेता येत नाही. हे पुरावे गोळा करून ते योग्य वेळी योग्यप्रकारे पेश करणे यातील नाट्य 'कोर्टरूम' कादंबरीला रोमहर्षक बनवते.**

एकेक तपशील काटेकोरपणे उभा करीन, या संपूर्ण खटल्यातील बारीकसारीक साक्षीपुरावा व युक्तिवाद बिनतोड व्हावा म्हणून जॉन ग्रिशॅमने घेतलेली दक्षता खरोखर थक्क करते. कोर्टात प्रत्येक गोष्ट सिद्ध करावी लागते; केवळ तर्काने वेळ मारून नेता येत नाही. हे पुरावे गोळा करून ते योग्य वेळी योग्यप्रकारे पेश करणे यातील नाट्य 'कोर्टरूम' कादंबरीला रोमहर्षक बनवते.

रेनमेकर म्हणजे विशिष्ट मताचा पाठपुरावा करून, त्याच्या बाजूने जनमत वळवणारा लॉबिइस्ट. रुडी बेलर हा वकील वैद्यकीय विम्याबाबत विमा कंपन्यांच्या गैरव्यवहाराविरुद्ध जनमत संघटित करून दाखवतो. त्यामुळे या कादंबरीला सामाजिक उत्तरदायित्वाच्या दृष्टीनेही महत्त्व येते.

**पृष्ठे :५६० ● किंमत : ३८० रु. ● सभासदांना : २८५ रु. ● पोस्टेज : २५ रु.**



# फर्स्ट टु डाय

**लेखक : जेम्स पॅटरसन**
**अनु : रविंद्र गुर्जर**




## मधुचंद्राच्या रात्रीच नवपरिणित जोडप्यांचे खून आणि गुन्हेगाराने ठेवलेले पुरावे

सॅन फ्रॅन्सिस्कोमधील पंचतारांकित ग्रँड हॉटेल. मेलनी आणि डेव्हिड यांचे थाटात पार पडलेले लग्न. बॉलरूममध्ये तीनशे पाहुण्यांनी मेजवानीबरोबर घेतलेला नृत्य-आलिंगनांचा मनमुराद आनंद. सगळे पाहुणे गेल्यावर नववधू-वरांना मिळालेला एकांत... डेव्हिडने बल्गेरियातून आणलेल्या चांदीच्या लांब रिंगमध्ये कोरलेल्या दोन हिऱ्याच्या चंद्रकोरींचे अप्रतिम डूल- मेलनीच्या कानाच्या पाळ्यावर धरत म्हटले,''तुझ्यामुळे मी आज आनंदाच्या सागरात विहरतो आहे...'' तेवढ्यात दारावर झालेली टकटक...'शांपेन' असा पाठोपाठ आलेला आवाज... डेव्हिड ब्रॅटने दरवाजा उघडून रंगीत रिबन गुंडाळलेला शांपेनचा बॉक्स घेत त्यावरील वाचलेला मजकूर... क्रग, क्लॉस ड्यु मेस्निल. १९८९.

- आणि ती शांपेन आणणाऱ्या व्यक्तीने पुढे होऊन डेव्हिडच्या छातीत खुपसलेला धारदार चाकू... अनपेक्षित हल्ल्याने आणि वेदनेमुळे घुसमटलेला डेव्हिड... त्याचे विस्फारलेले डोळे... जमिनीवर कोसळणे... डेव्हिडच्या छातीतून चाकू बाहेर काढून, तोच रक्तरंजित चाकू नंतर मेलनीच्या गळ्यावर उगारला गेल्यावर तिचे भेदरलेले डोळे... ''मला मारू नका.'' पण तिच्या विनवणीला भीक न घालता शांपेन आणणाऱ्या त्या तरुणाने तिच्यावर सपासप केलेले वार... तिला उचलून बेडरूममध्ये नेऊन तिच्या मऊ गालांवरून हात फिरवत, वर उचलेला तिचा नववधूचा पांढरा शुभ्र गाऊन...

सकाळी हॉटेलचा असिस्टंट मॅनेजर या जोडप्याला उठवायला जातो, तेव्हा ते दृश्य बघून हैराण होतो. नवदांपत्याच्या या हत्येने सॅन फ्रॅन्सिस्कोच्या पोलिस दलात खळबळ उडणे साहजिकच.

पोलिस इन्स्पेक्टर सार्जंट मिस लिंडसे बॉक्सर हॉटेलला भेट देऊन पाहणी करते.

रुमच्या दाराला लागूनच पडलेला नवरा मुलगा डेव्हिड... उघडा उंची शर्ट. छातीच्या केसांवर गोठलेले रक्त... आणि बेडरुममध्ये बिछान्यावर पाठीवर पडलेली नववधूच्या गाऊनमधली तरुण मुलगी. शांत, निश्चल, निश्चिंत. तिच्या गोऱ्या छातीवर तीन ठिकाणी

रक्ताची उमटलेली तीन फुलं...

दाराजवळच पडलेला शांपेनचा बॉक्स... रक्तानं माखलेलं जाकिट.

हा खून पैशासाठी तर दिसत नव्हता. मग सेक्ससाठी असावा का?

इन्स्पेक्टर मिस बॉक्सर नववधूच्या स्कर्टची कड वर उचलते. पँटी खाली ओढलेली असते. ती एका पायात लटकत असते. पोलिस इन्स्पेक्टर असूनही तिच्या डोळ्यात पाणी येते.

''काल रात्री या मजल्यावर असलेल्या प्रत्येकाची मला मुलाखत हवीय.'' ती म्हणते. तपास सुरू करते. बाहेरच्या कोणालाही हॉटेलमध्ये शिरण्यास मज्जाव करते.

तरीही क्रॉनिकलची वार्ताहर सिंडी थॉमस ग्रँड हॉटेलामध्ये पोचतेच. नवदांपत्याच्या हत्येची बातमी तिला कळते. इन्स्पेक्टर मिस बॉक्सर तिला बजावते,

''मला तुला काही एक सांगायचं नाही.''

.... सारे पोलिसखाते कामाला लागते.

दुपारच्या क्रॉनिकलमध्ये हेडलाइन असते,

**''लग्नाच्या रात्री ग्रँड हॉटेलात हत्याकांड.''**

नंतर बातम्या येतात त्यात आणखी काही तपशील येतात.

''प्रेतावर लैंगिक अत्याचार. रक्तरंजित जाकिट. गायब झालेल्या अंगठ्या... या मागे झपाटलेला खुनी असण्याची शक्यता. लग्नाच्या रात्रीच हे खून... सेक्स विकृतीतून हा प्रकार झाला असावा का?''

या प्रकरणाचा शोध अजून प्राथमिक अवस्थेतच असताना 'नापा' येथील पंचतारांकित हॉटेलात अशाच प्रकारे खून होतो.

नव्यानेच लग्न झालेले मायकेल व बेकी डीजॉर्ज हे जोडपे नापातील सर्वोत्कृष्ट फ्रेंच रेस्टॉरंटकडे जाण्यासाठी पार्किंग लॉटच्या दिशेने चालले असताना एक काळी लिमो त्यांच्याजवळ थांबते,''मी हॉटेलतर्फे तुमच्या सेवेसाठी हजर आहे. ही लिमो आजच्या रात्रीसाठी खास बुक केलेली आहे.''

**रुमच्या दाराला लागूनच पडलेला नवरा मुलगा डेव्हिड... उघडा उंची शर्ट. छातीच्या केसांवर गोठलेले रक्त... आणि बेडरुममध्ये बिछान्यावर पाठीवर पडलेली नववधूच्या गाऊनमधली तरुण मुलगी. शांत, निश्चिंत.**

मागच्या गुबगुबीत सीटस्, चकचकीत ग्लासेस, छोटा बार, बर्फात ठेवलेली खास शांपेनची बाटली... अशा आलिशान गाडीतून रेस्टॉरंटकडे जाण्याची कल्पना बेकी डी जॉर्जला सुखद वाटते...

ते दांपत्य लिमोमध्ये बसते.

''तुमचं लग्न नुकतंच झालंय. पहिलीच रात्र आहे. मी मधला पडदा बंद करतो. काय हवं ते करा.'' म्हणत ड्रायव्हर मधला पडदा बंद करतो.

नवदांपत्य एकमेकाच्या बाहुपाशात..



- आणि अचानक कार थांबते. मधला पडदा दूर होतो. आणि ड्रायव्हर मायकेल व बेकी यांच्यावर पिस्तुलाच्या गोळ्या झाडतो...

दुसऱ्या दिवशी नापातल्या मद्यनिर्मिती केंद्राजवळ त्या दोघांची प्रेते सापडतात. कामक्रीडा करीत असताना त्यांना ठार केले गेले- असे दृश्य दिसते. नवऱ्याच्या कपाळावर मध्यभागी गोळीचे छिद्र. पत्नीचा काळा झगा मानेपर्यंत वर. ब्रा कमरेपर्यंत खाली ओढलेली. चड्डी गुडघ्यापर्यंत खाली सरकवलेली...

.... लग्नाची अंगठी त्यांच्या बोटात नव्हती. शिवाय लाल दाढीचा केसही दोन्ही ठिकाणी आढळला.

सॅन फ्रॅन्सिस्कोमधील हत्येशी तर याचा संबंध नाही ना? पुरावे मागे ठेवणारा हा मानसिक विकृती असलेला खुनी- एकच नव्हे ना?

- वाचकांना धक्क देणाऱ्या या खुनांनी जेम्स पॅटरसनच्या 'फर्स्ट टु डाय' या रहस्यकथेची थरारकता वाढत जाते.

या गुन्ह्यांमधील साम्य शोधताना आणखी काही गोष्टी लक्षात येतात. त्यांचा तपास हा इन्स्पेक्टर लिंडसे बॉक्सरच्या प्रतिष्ठेचा प्रश्न ठरतो. पोलिस प्रमुखपदी असणारी ती एकमेव महिला. पहिलीच महिला, तिच्या वैयक्तिक जीवनातल्या काही समस्याही नेमक्या त्याचवेळी उफाळून आलेल्या. घटस्फोटानंतर जाणवणारा एकटेपणा. त्याचवेळी एका असाध्य शारीरिक व्याधीने तिच्यावर केलेला हल्ला, नेगली ऑप्लास्टिक ॲनेमिया हा दुर्मिळ विकार. लाल पेशींची निर्मिती योग्य त्या प्रमाणात होण्याची प्रक्रिया थांबल्याने वरचेवर रक्तपुरवठा करण्याची जरुरी. डॉक्टरांना ती खोदून खोदून विचारते तेव्हा डॉक्टर सांगतात, ''अग, सत्य हे आहे मुली, की हा जीव घेणारा विकार आहे. प्राणघातक... तोही दुसऱ्या आणि तिसऱ्या पायरीच्या मध्यावर... दीर्घकाळ उपचार घेणे क्रमप्राप्त. उपचार घेत असताना पुरेशी ताकद आहे असे वाटेपर्यंत तू कामाला जाऊ शकतेस. तेच खरं तर चांगलं औषध आहे.''

**''प्रेतावर लैंगिक अत्याचार. रक्तरंजित जाकिट. गायब झालेल्या अंगठ्या... या मागे झपाटलेला खुनी असण्याची शक्यता. लग्नाच्या रात्रीच हे खून... सेक्स विकृतीतून हा प्रकार झाला असावा का?''**

पोलिस यंत्रणा आपल्या परीने या गुन्ह्यांचे धागेदोरे उलगडत असतेच. पण मिस बॉक्सर, पत्रकार सिंडी, मैत्रीण क्लेयर आणि वकील जिल या चौघी 'दि वुमेन्स मर्डर क्लब' स्थापन करून गुन्हेगार शोधण्यासाठी एकत्र येत राहतात..

तेवढ्यात तिसऱ्या नवविवाहित जोडप्याची अशाच प्रकारे हत्या झाल्याची बातमी येते. पण ही हत्या दूर क्लीव्हलँडमध्ये झालेली असते.

गुन्ह्याच्या ठिकाणचे फोटो बघताना एका लाल दाढीवाल्याचा फोटो मिळतो. तो

चेहरा रहस्यकथालेखक निकोलस जेंक्स याच्या चेहऱ्याशी साम्य दाखवणारा असतो. त्यामुळे त्याचीही भेट इन्स्पेक्टर बॉक्सर ही घेते. बरोबर सहकारी पोलिस ऑफिसर क्रिस्तोफर हाही असतो. जेंक्स शँपनेचा चाहता असतो. त्याच्या नावावरही नऊ मिलीमीटरच्या पिस्तुलाची नोंद असते. (तसे पिस्तुल दुसऱ्या खुनात वापरले गेलेले असते) त्याच्या लाल दाढीच्या केसाचा नमुनाही घेण्य ाात येतो. त्याची पत्नी चेसी ही तेथे असते. ती गमतीने म्हणते,''माझा नवरा अखेर खुनशी वृत्तीचा झाला? मी त्याला नेहमी सांगते की विचित्र-विकृत व्यक्तिरेखा लिहून एक दिवस असंच होणार.''

...जेंक्सला विकृत सेक्सची चटक लागलेली असते. चेसीला कपड्यांच्या कपाटात ढकलून तिथल्या अंधारात मागच्या भिंतीशी दाबून, तो आडदांडपणे आपली तृप्ती करून घेतो.

जेंक्सच्या पहिल्या पत्नीचा - जोआना वेड हिचा- शोध घेण्यात येतो.

मिस बॉक्सर तिला विचारते, ''निकी खून करू शकेल?''

जोआन विचारते,''तुम्ही त्याची पुस्तकं वाचलीत?... त्या गुन्ह्यांच्या बातम्या वाचल्यावर मला निकचं पुस्तक आठवलं.''

''कुठलं पुस्तक?''

''ऑलवेज् ए ब्राइडस मेड... मला वाटलं, त्यामुळंच तुम्ही इथं आलात. त्याचा संबंध खुनाशी जोडण्यासाठी.''

''तुम्ही काय बोलताय?''

''आमची भेट होण्यापूर्वी त्यानं ती कादंबरी लिहिली. पण ती प्रसिद्ध झाली नाही. तिच्यात एक कायद्याचा विद्यार्थी नववधूवरांचे खून करत सुटतो असं दाखवलं आहे. तसंच बरंचसं आता प्रत्यक्षात घडलं आहे.''

....आणि या प्रकरणाला वेगळीच कलाटणी मिळते.

ती कशी?

हे इथे सांगण्यात मजा नाही.

**''अग, सत्य हे आहे मुली, की हा जीव घेणारा विकार आहे. प्राणघातक... तोही दुसऱ्या आणि तिसऱ्या पायरीच्या मध्यावर... दीर्घकाळ उपचार घेणे क्रमप्राप्त.**

रहस्यकथेतले रहस्य हे स्वत: वाचूनच जाणून घ्यायला हवे.

एक नक्की, जेम्स पॅटरसन एकातून दुसरे, दुसऱ्यातून तिसरे असे काहीतरी चमत्कार करीत वाचकांना वरचेवर चक्रावत राहतो.

- आणि शेवटी तो अखेरची कलाटणी देतो ती म्हणजे एक मास्टरस्ट्रोकच आहे. हनीमून साजरा करणाऱ्या जोडप्यांचे लग्नाच्या रात्रीच निर्घृण खून करणाऱ्या या लिंगपिसाट गुन्हेगाराची अजब मानसिकताही जेम्स पॅटरसन दाखवतो. ती पटली, न पटली तरी ही कथा वाचकांना खिळवून ठेवते हे खरे!

**पृष्ठे : २८४ ● किंमत : २०० रु. ● सभासदांना : १५० रु. ● पोस्टेज : २५ रु.**



## वायू प्रदूषण

लेखक
डॉ. किशोर पवार
सौ. नलिनी पवार




### जगभरातील पर्यावरण तज्ज्ञांना भेडसावणारी प्रदूषणाची समस्या

* ताजमहालच्या शुभ्र संगमरवरी दगडांवर काळे, तपकिरी चट्टे पडून त्याची तकाकी नष्ट होत आहे. आग्रा शहरापासून ४० किलोमीटरवर असलेल्या मथुरा तेलशुद्धीकरण कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या सल्फर डाय ऑक्साइडचा हवेतील बाष्पाशी संयोग होऊन तयार होण्याऱ्या सल्फ्युरिक आम्लाचे ढग ताजमहालवर विषारी आम्लाचा वर्षाव करतात; त्यामुळे ताजमहालचा शुभ्र रंग काळवंडत आहे आणि त्यावर लहानलहान भेगा पडत आहेत. त्यातील लोखंड गंजत आहे आणि त्यामुळे ताजमहाल कमकुवत होत आहे. रासायनिक प्रक्रियेमुळे तयार होणाऱ्या जिप्सममुळे कॅल्शिअम कॉर्बोनेटचे खवले निघून ताजमहालचा पृष्ठभाग ठिसूळ होत आहे. हे असेच चालू राहिले तर ताजमहालचे अस्तित्वच धोक्यात येईल.

* हैदराबाद शहरातील चार मिनार हे ऐतिहासिक शिल्प. स्वयंचलित वाहनांकडून बाहेर पडणारा धूर, सल्फर डाय ऑक्साइड, नायट्रोजन ऑक्साइड, हायड्रोकार्बन इ. घटकांमुळे चार मिनारच्या चुन्यावर प्रतिकूल परिणाम होऊन तो ठिसूळ बनत चालला आहे. काही वर्षांनी चार मिनार जमीनदोस्त झाले तर आश्चर्य वाटू नये.

* ३ डिसेंबर १९८४ रोजी भोपाळमधील युनियन कार्बाइडच्या कारखान्यातील एका टाकीतून मेथिल आयसोसायनेट या विषारी वायूची अचानक गळती सुरू झाली आणि पाच हजार लोक मृत्यूमुखी पडले. हजारो लोकांना विविध व्याधींनी त्रस्त केले. अल्डीकार्ब हे कीटकनाशक तयार करण्यासाठी मेथिल आयसोसायनेटचा वापर कच्चा माल म्हणून केला जातो. हा वायू साठवण्याची व्यवस्था सदोष असल्याने वायूची गळती झाली. युनियन कार्बाइडला त्यासाठी ४० कोटी डॉलर्सची नुकसान भरपाई द्यावी लागली; परंतु शेकडो कुटुंबे उद्ध्वस्त झाली ती झालीच!

* वाहनांसाठी वापरण्यात येणाऱ्या पेट्रोलमध्ये टेट्राइथिल लेड हे शिशाचे संयुग

वापरले जाते. हे शिसे धुरावाटे वातावरणात पसरते. शिशाचे सूक्ष्म कण श्वासावाटे फुफ्फुसात शिरतात. शिशामुळे डोकेदुखी, चिडचिड, अंधत्व, पक्षाघात वगैरे विकार उद्‌भवतात. मेंदू व मज्जासंस्था यावर परिणाम होतो. हृदय व मूत्रपिंड बिघडते. शिशामुळे रक्तातील हिमोग्लोबिन या घटकाच्या निर्मितीत अडथळा निर्माण होतो व पंडुरोग होतो.

ही सर्व वायूप्रदूषणाची उदाहरणे होत.

प्रदूषण ही समस्या सध्याच्या जगाला सर्व पातळ्यांवर भेडसावत आहे. माणसाने विकासाच्या नावावर निसर्गाच्या स्वाभाविक व्यवस्थेत ढवळाढवळ चालवली आहे; त्यामुळे मानवासह सर्वच सजीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हवा, पाणी, मृदा (जमीन) यांचे प्रदूषण पर्यावरणाचे संतुलन बिघडविण्यास कारणीभूत ठरत आहे.

या प्रदूषणांपैकी वायूप्रदूषणावर डॉ. किशोर पवार आणि सौ. नलिनी पवार यांनी सर्वांगीण माहिती देणारे स्वतंत्र पुस्तकच मराठीत लिहून, या समस्येचे गांभीर्य वाचकांच्या लक्षात आणून दिले आहे.

वायू प्रदूषण म्हणजे
वातावरणातील अतिरिक्त
मानवनिर्मित असून ते
राहिल्यास मानवाच्या
जीवनाला, आरोग्याला
आणतात, असे भारतीय
प्रदूषणाचे स्वरूप विशद
वायू प्रदूषण म्हणजे
अनेक दूषित घटकांचा
त्यामुळे मानव, वनस्पती,
यावर दुष्परिणाम होऊन
आणि मानवी जीवनातील
जाणे; असे अमेरिकेच्या
कौन्सिलने म्हटले आहे.

**रासायनिक प्रक्रियेमुळे तयार होणाऱ्या जिप्समुळे कॅल्शिअम कॉर्बोनेटचे खवले निघून ताजमहालचा पृष्ठभाग ठिसूळ होत आहे. हे असेच चालू राहिले तर ताजमहालचे अस्तित्वच धोक्यात येईल.**

बाह्य घटकांचे
प्रमाण. हे घटक
वातावरणात दीर्घकाळ
सुखी समाधानी
आणि समृद्धीला बाधा
मानव संस्थेने वायू
केले आहे.
वातावरणात एक किंवा
शिरकाव होणे; आणि
प्राण तसेच मालमत्ता
मालमत्तेची हानी होणे
मौज व आनंद हिरावला
इंजिनिअर्स जॉइंट

वाढते औद्योगिक, शहरीकरण, लोकसंख्या वाढ, स्वयंचलित वाहनांचा वापर, कृषिक्षेत्रात कीटकनाशकांचा वापर, खाणकाम, भट्ट्या यामुळे वायूप्रदूषणाची समस्या उग्र बनत आहे.

वातावरणातील धूळ, धूर, सूक्ष्म घनतरंग यामुळे प्रकाश अडवला जाऊन सूर्यापासून मिळणारी उष्णता कमी होत आहे; या उलट हरितगृह परिणामुळे हवेतील कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण वाढून तापमान वाढत आहे. त्यामुळे भूतलावरील बर्फ वितळून महापूर येऊन मानवी अस्तित्वाला धोका पोचत आहे. वायू प्रदूषणामुळे कॅन्सर, दमा, अंधत्व, नपुंसकत्व, त्वचारोग, श्वसन विकार, यांचेही प्रमाण वाढत आहे.

कारखाने, जैविक इंधन, पेट्रोल, कीटकनाशकांचा वापर, स्वयंचलित वाहने, हवाई वाहतूक, शहरीकरण, जंगलतोड, अणुचाचण्या, अणुवीज निर्मितीकेंद्रे, युद्धे, रासायनिक



व जैविक अस्त्रांचा वापर, फटाके, दारुकाम, कृषिक्षेत्रातील कचऱ्याचे ज्वलन वगैरे मानवनिर्मित घटक वायुप्रदूषणाला हातभार लावतात. नैसर्गिक घटक (ज्वालामुखीच्या उद्रेकातून बाहेर पडणारे विषारी वायू, राख, धूर, धूळ), निसर्गात मृत झालेल्या सेंद्रिय पदार्थांची कुजण्याची प्रक्रिया, विषाणू, जीवाणू व बुरशीचे बिजाणू- वगैरे नैसर्गिक प्रदूषक होत.

गंधकभस्मे, नायट्रोजनची भस्मे, कार्बन मोनॉक्साइड, ओझोन, हायड्रोजन सल्फाइड, वगैरे रासायनिक द्रव्येही प्रदूषणाला कारणीभूत ठरतात.

वाहनांच्या धुराड्यातून बाहेर पडणाऱ्या शिशापैकी ४० टक्के शिसे जमिनीवर स्थिरावते आणि ६०टक्के हवेत शिरते. हे शिसे श्वासावाटे मानवी शरीरात शिरते. ते अनेक विकारांना कारण ठरते. शिशामुळे शरीरातील अनेक एनझाइम्सचे कार्य थांबते; हिमोग्लोबिनची निर्मिती मंदावते, मूत्रपिंडांचे काम बिघडते, मेंदूलाही इजा होते, तांबड्या रक्त पेशींचा नाश होऊन यकृत व मूत्रपिंड यांना चटकन रोगसंसर्ग होऊ शकतो; हाडातील कॅल्शिअम नष्ट होऊन ती ठिसूळ होतात.

किरणोत्सर्गी
निसर्गावर व मानवी
औष्णिक विद्युत
प्रकाश रासायनिक धुरके
स्मॉग), हरितगृह
वायूप्रदूषण वाढवण्यास
वायूप्रदूषणाला
आता तयार होऊ
सेटलिंग चेम्बर्स, जड
करणारी उपकरणे,
पिंजरा, चाळणी यंत्र,
स्क्रबर, फवारणी मनोरे,
भस्मीकरण
वगैरेंची उपयोग आता


**वाढते औद्योगिक, शहरीपण, लोकसंख्या वाढ, स्वयंचलित वाहनांचा वापर, कृषिक्षेत्रात कीटकनाशकांचा वापर, खाणकाम, भट्ट्या यामुळे वायूप्रदूषणाची समस्या उग्र बनत आहे.**


पदार्थांच्या प्रदूषणाचाही
जीवनावर दुष्परिणाम होतो.
केंद्रे, आम्ल पर्जन्य,
(फोटो केमिकल
परिणाम यांचाही
हातभार लागतो.
आळा घालणारी उपकरणेही
लागली आहेत. कलेक्टर्स,
कणरूप पदार्थ गोळा
चक्रीय संग्राहक, धूळ
स्थिर विद्युत उत्सारक,
व्हेंच्युरी घासणी,
(ऑक्सिडेशन) पद्धत
मोठ्या प्रमाणावर केला

जात आहे. पर्यावरणविषयक वेगवेगळे कायदेही आत केले गेले आहेत. तरीही प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

'वायूप्रदूषण' हे पुस्तक म्हणजे अशा बहुमोल माहितीचा खजिना आहे.

**पृष्ठे : १८८ ● किंमत : १५० रु. ● सभासदांना : ११२ रु. ● पोस्टेज : २५ रु.**






# 'हॅलो मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय'

लेखक
**व. कृ. जोशी**

**सत्य घटनांवर आधारित पोलिस तपासाच्या रोमहर्षक कथा**

दक्षता मासिकाचे प्रवर्तक आणि भूतपूर्व संपादक व. कृ. जोशी यांनी पोलिसकथांचे सातत्याने लेखन करून, पोलिसकथांना मराठी साहित्यात एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून स्थान मिळवून दिले.

रहस्यकथा, डिटेक्टिव्ह स्टोरी, अपराध शोधकथा, भयकथा, चित्तथरारक कथा अशा अनेकविध रूपांमध्ये गुप्तहेरकथांनी गेल्या दीडशे वर्षात यूरोप-अमेरिकेत स्वत:चा वाचकवर्ग निर्माण केला आहे. १८४१ मध्ये एकशे साठ वर्षांपूर्वी एडगर ॲलन पो याची 'दि मर्डर्स इन दि रू मॉर्ग' ही डिटेक्टिव्ह कथा प्रसिद्ध झाली. एकाच गुप्तहेराच्या आयुष्यातील वेगवेगळ्या तपासकथा हा प्रकार या कथेपासून सुरू झाला. पोलिसखात्याबाहेरच्या कोणीतरी गुप्तहेराने गुन्ह्याचा छडा लावणे ही गोष्ट त्यावेळी काहीशी अनपेक्षित व अवास्तव अशीच होती. कारण गुन्हा म्हटला की अपराधी शोधून काढणे हे काम पोलिसाचे गणले जाई. खाजगी गुप्तहेर हा प्रकार त्यावेळी नव्हता. पोलिस खात्यात ब्रिटनमध्ये डिटेक्टिव्हची जागा प्रथम १८४२ साली म्हणजे एडगर ॲलन पोच्या वरील कथेच्या प्रसिद्धीनंतर निर्माण केली गेली. गुप्तहेर डुपिन हा गुन्ह्याच्या जागी जे पुरावे सापडतात, त्यावरून शास्त्रीय विश्लेषण करीत गुन्हेगाराचा आणि तिच्या हेतूचा शोध लावून दाखवतो. एडगर ॲलन पो ने आपल्या गुप्तहेर नायकाला काम करण्यास सोपे जावे म्हणून आपल्या कथा पॅरिसच्या पार्श्वभूमीवर लिहिल्या आहेत. न्यूयॉर्कमध्येही १८४४ साली 'डे अँड नाइट पोलिस' दलाची स्थापना केली गेली; त्यालाही निमित्त एडगर ॲलन पोच्या कथेतील मेरी रॉजेटच्या खुनासारखीच घडलेली घटना हे होते. प्रत्यक्षात मेरी रॉजर्सची हत्या झाली होती, आणि त्या हत्येबद्दल जनतेत प्रक्षुब्ध प्रतिक्रिया उमटल्या होत्या. पॅरिसच्या प्रिफेक्ट जी या पोलिसयंत्रणेकडून डुपिनचे कौतुक झाले; आणि पोलिस विरुद्ध गुप्तहेर असा संघर्ष आरंभी तरी टळला. पुढे अनेक रहस्यकथाकारांनी आपला गुप्तहेर नायक आणि पोलिस यंत्रणा यातील संघर्ष कमीजास्त तपशीलात हाताळलेले आहेत. बहुतांशी उदाहरणात, पोलिसांपेक्षा गुप्तहेरच खरा अपराधी शोधून काढतो; पण उदार मनाने त्याचे श्रेय मात्र पोलिस अधिकाऱ्याला देऊन पुढील कायदेशीर कारवाईचा मार्ग मोकळा करून देतो.



आर्थर कॉनन डॉयल याने शेरलॉक होम्सला जन्म दिला. १८८७ साली त्याची पहिली रहस्यकथा 'ए स्टडी इन स्कारलेट' प्रसिद्ध झाली. दि साइन ऑफ फोअर, (१८९०), दि ॲडव्हेंचर्स ऑफ शेरलॉक होम्स (१८९२), दि हाऊंड ऑफ बास्करविले (१९०२), पासून दि केस बुक ऑफ शेरलॉक होम्स (१९२७) डॉयलने अनेक रहस्यकथा लिहिल्या.

ॲगाथा ख्रिस्तीने रहस्यकथासम्राज्ञी असा लौकिक मिळवला. १९२० साली दि मिस्टेरियस अफेअर ॲट स्टाइल्स ही रहस्यकथा प्रसिद्ध झाली. काही कार्यक्रमानिमित्त कंट्री हाऊसमध्ये बरेच पाहुणे जमलेले असतात; अशा वेळी खून होतो. तो खून करण्याची कारणे अनेकांकडे असतात. एकेकावर संशयाचे जाळे टाकत शेवटी खऱ्या गुन्हेगारापर्यंत हर्क्युल पॉयरॉ हा गुप्तहेर कसा पोचतो याचा विलक्षण उत्कंठावर्धक कथाभाग ॲगाथा ख्रिस्ती फुलवत जाते. प्रत्येक व्यक्ती काहीतरी लपवू पाहते; त्यामुळे तिच्याबद्दलचा संशय वाढत जातो. आणि शेवटी कोणीतरी वेगळीच व्यक्ती गुन्हेगार म्हणून समोर येते तेव्हा वाचकाला आपल्या बौद्धिक क्षमतेबद्दलच साशंकता वाटू लागते.

इआन फ्लेमिंग (जेम्स बाँडचा निर्माता), पी. डी. जेम्स, जॉन ल कार (दि स्पाय हू केम फ्रॉम दि कोल्ड) यांच्या थरारकथांनीही 'बेस्टसेलर्स' म्हणून अमाप प्रसिद्धी मिळवली.

मराठीत बाबूराव अर्नाळकरांच्या धनंजय छोटू आणि काळा पहाड झुंजार-विजया यांनी एकेकाळी वाचकांना झपाटून टाकले. मधुकर अर्नाळकर, नारायण धारप, गुरुनाथ नाईक, शरच्चंद्र वाळिंबे, दिवाकर नेमाडे, सुहास शिरवळकर, सहृदय प्रभृतींनी कधीकाळी झपाटून रहस्यकथांचे रतीब घातले. आज नाव घेण्याजोगा कोणी नव्या दमाचा रहस्यकथाकार मराठीत नाही.

**प्रत्येक व्यक्ती काहीतरी लपवू पाहते; त्यामुळे तिच्याबद्दल संशय वाढत जाते. आणि शेवटी कोणीतरी वेगळीच व्यक्ती गुन्हेगार म्हणून समोर येते तेव्हा वाचकाला आपल्या बौद्धिक क्षमतेबद्दलच साशंकता वाटू लागते.**

या पार्श्वभूमीवर व. कृ. जोशी यांच्या पोलिसकथाच्या लेखनातील सातत्य वाखाणण्याजोगे आहे. ते स्वत: पोलिस खात्यात होत आणि महासंचालकपदावरून निवृत्त झाले. त्यांच्या बहुतेक कथांमध्ये इन्स्पेक्टर प्रधान हेच मुख्य तपास अधिकारी असून तेच गुन्हेगाराचा छडा लावतात. पोलिस खात्याच्या नेहमीच्या खाक्याचा थर्ड डिग्री इ. वापर ते क्वचितच करतात; ते सहृदय आहेत; समंजस आहेत. मानसशास्त्राचे जाणकार आहेत आणि अपराध्याला शासन व्हावे अशा मताचे असले तरी जीवनविषयक काही मूल्यांवर त्यांची श्रद्धा आहे आणि त्या मूल्यांना प्रमाण मानूनच पोलिसखात्यातही ते निष्कलंक अधिकारी म्हणून आपली प्रतिमा निर्माण करण्यात यशस्वी झालेले आहेत.

इन्स्पेक्टर प्रधान यांच्यापुढे वेगवेगळ्या प्रकारच्या केसेस येतात; आणि त्या सोडवताना सकृत् दर्शनी समोर येणारा पुरावा आणि तपासानंतर त्या केसेसमधील सत्यापर्यंत त्यांची होणारी वाटचाल यांच्या तपशीलातून या पोलिसकथांचा डोलारा उभा राहतो.

'एक रिकामी बाटली' ही कथा प्रेमाची चौकोनी दास्तान पेश करते; त्या बरोबरच

आत्महत्या की खून असा पेचही टाकते. डॉ. माने यांचा सिव्हिल हॉस्पिटलमधून फोन येतो - तासापूर्वीच एक केस ॲडमिट झाली आहे... तिची कंडिशन सीरिअस आहे... पोटात काहीतरी घेतलं गेलं आहे... मरणपूर्व जबाब घेतला तर बरं...''

ही केस असते रोहिणीची. तिने झोपेच्या गोळ्या घेतलेल्या असतात. आत्महत्या करण्याचा तिचा प्रयत्न का? कारण तिला दिवस गेले होते. अविवाहित असूनही. घराण्याची बेअब्रू टाळावी म्हणून रोहिणीची आई पोलिसांना विनंती करते - चुकीने तिने झोपेच्या गोळ्या जास्त घेतल्या असे चौकशीत नमूद करावे.

....पण हे सर्व इतके सरळ असते का?

पोलिस तपासात वेगवेगळ्या गोष्टी उघड असतात.

रोहिणीची मैत्रीण संध्या कर्करोगाने आजारी. तिच्या भेटीला रोहिणी वरचेवर जात असते. रोहिणीचा तिच्या नवऱ्याशी संबंध वाढतो. दिवस राहिल्यावर ती त्याला लग्नाबद्दल लकडा लावते. तो संध्याच्या मृत्यूपर्यंत थांब म्हणतो.

रोहिणीच्या फॅमिली डॉक्टरांकडे चौकशी करता, ते सांगतात; ''रोहिणीला मी कधी झोपेच्या गोळ्या प्रिस्क्राइब केल्याच नाहीत. रोहिणीच्या आईला मात्र झोपेच्या गोळ्या देत होतो.''


**या कथा साध्या सरळ क्वचितच असतात. त्यात अनेक उपकथानके असतात. संशय घेता यावा अशा अनेक व्यक्ती असतात. त्यांच्याजवळ तशी कारणेही असतात. त्यातून शेवटी नेमक्या गुन्हेगारापर्यंत पोचणे यात पोलिस तपास, तर्कशक्ती यांच्याप्रमाणेच योगायोगाचाही भाग असतो.**


रोहिणीचे शेजारी रामभाऊ सांगतात, ''काल रात्री रोहिणीला भेटायला प्रमोद नगरकर आला होता. हा तिचा पूर्वाश्रमीचा प्रियकर. त्याच्याशी तिचे लग्न व्हायचे होते.'' प्रमोद म्हणतो,''संध्या ही माझी आतेबहीण. मरणाची वाट बघताना तिला आपल्या नवऱ्याचे दुसरीशी प्रेमाचे चाळे पहावे लागले. मला देवानं लवकर मरण का नाही दिलं?... रोहिणीच्या आईनं मला निरोप पाठवून बोलावून घेतले. गरोदर रोहिणीशी लग्न करायची गळ घातली... रोहिणी मात्र लग्नाला नकार देते. मला जगायचा अधिकार नाही म्हणते... मात्र ही आत्महत्या नाही. खून आहे. सरलाबाईंच्या कपाटातल्या झोपेच्या गोळ्यांची बाटली तिने घेतली; पण तिला नकळत तिच्यातल्या दहाही गोळ्या मी काढून घेतल्या.''

पोस्टमार्टेमच्या रिपोर्टात झोपेच्या गोळ्यांसारखा मादक पदार्थ पोटात जाऊन मृत्यू-असे मत.

... मग या झोपेच्या गोळ्या रोहिणीला दिल्या कुणी?

... इन्स्पेक्टर प्रधान याचा छडा लावतातच.

'सरकारी पाहुणा' या कथेचीही उभारणी अशी कलाटणी देणारी आहे.

मुंबईतल्या सी व्ह्यू हॉटेलातील विजय-स्नेहप्रभा यांच्या वाङ्‌निश्चयाच्या पार्टीला इन्स्पेक्टर प्रधान निमंत्रण नसतानाही हजेरी लावतात आणि वराच्या पित्याला - बाबूराव मिटकरांना एका तरुणीचा फोटो दाखवून विचारतात,''या मुलीला तुम्ही ओळखता? हिचा गळा दाबून खून झाला आहे. रस्त्याच्या कडेला तिचे प्रेत सापडले. हिच्याजवळ तुमच्या पार्टीचे



निमंत्रणकार्ड मिळाले.'' या तरुणीला ओळखत नाही असे बाबूराव म्हणतात.

बाहेर पार्किंग लॉटमध्ये एका कारचा मडगार्ड नव्याने दुरुस्त केल्याचे व त्याला रंग दिल्याचे प्रधानांचे सहकारी हवालदार शोधून काढतात.

... ती कार अच्युत पाडळकरची असते. तो म्हणतो,''एका पार्टीहून परतताना कार पंक्चर झाली. मी डिकी उघडली. तर मला हे प्रेत दिसले. मी ते प्रेत झुडपात टाकून पालापाचोळ्याने झाकले... परतताना गाडी रस्त्याच्या दगडावर आदळली. मी खून केला नाही. प्रेत दडवण्याची चूक केली हे मात्र खरे!''

पाडळकर जिथं पार्टी होती, त्या बंगल्याकडे कार नेतात. तो बंगला रावसाहेब कल्लूरांचा. ते विजय साटमचे मामा. जिचा खून झाला ती मंगला हिला विजयने लग्नाचे आश्वासन दिलेले- अशी माहिती सखू मोलकरीण सांगते. ...रात्री बंगल्यावर पार्टी असते. मंगलाला स्टेशनवर पोचवले असे रावसाहेब सांगतात.

... आणि गुन्हेगाराचा तपास लावण्यात इन्स्पेक्टर प्रधानांना यश येते.

अशा अनेक कथा या पुस्तकात आहेत. पोलिस खात्याच्या कार्यपद्धतीवरही त्या प्रकाश टाकतात.



**पोलिसखात्यात अशा निःस्पृह आणि कर्तव्यदक्ष व्यक्ती अजूनही आहेत; याचा अभिमान व. कृ. जोशी यांच्या या पोलिसकथांमधून पदोपदी जाणवतो.**


या कथा साध्या सरळ क्वचितच असतात. त्यात अनेक उपकथानके असतात. संशय घेता यावा अशा अनेक व्यक्ती असतात. त्यांच्याजवळ तशी कारणेही असतात. त्यातून शेवटी नेमक्या गुन्हेगारापर्यंत पोचणे यात पोलिस तपास आणि तर्कशक्ती यांच्याप्रमाणेच योगायोगाचाही भाग असतो. पुराव्याशिवाय पोलिसांचे पानही हलत नाही. खोट्यापेक्षा खऱ्यावरच विश्वास ठेवणे फार कठीण जाते. (पृष्ठे ८१) गुन्हेगार काहीतरी खूण मागे ठेवूनच जातो. मग ती रिकामी बाटली असेल, तुटकी चप्पल असेल, शर्टची कॉलर असेल. मोठ्या माणसांचे संभावित सामाजिक स्थान येथे अनेकदा उघडे पडते. माणसांचे बुरखे फाटून जात नाहीत तोवरच ते इज्जतदार असाही प्रत्यय येतो. (४९).

इन्स्पेक्टर प्रधान हे कर्तव्यदक्ष, समंजस, सौजन्यशील आणि सहृदय आहेत. सामाजिक वास्तवतेचे भान त्यांना आहे. ''माझ्या हातून चुका होतील, पण अन्याय कधीही होणार नाही'' ही त्यांची ग्वाही.

पोलिसखात्यात अशा नि:स्पृह आणि कर्तव्यदक्ष व्यक्ती अजूनही आहेत; याचा अभिमान व. कृ. जोशी यांच्या या पोलिसकथांमधून पदोपदी जाणवतो.

**पृष्ठे : १६० ● किंमत : १२० रु. ● सभासदांना : ९० रु. ● पोस्टेज : २० रु.**




# पोलिसकथा

लेखक
व. कृ. जोशी

**समाजातील विविध अंत:प्रवाहांचे विस्मयकारक दर्शन घडवणाऱ्या पोलिसकथा**

व. कृ. जोशी यांच्या २० कथांचा समावेश 'पोलिसकथा' या संग्रहात केला गेला आहे. इन्स्पेक्टर प्रधान यांनी हाताळलेल्या गुन्ह्यांच्या तपासाच्या या कहाण्या आहेत. त्यात 'कथा' शैलीदारपणे सांगण्याचा वाङ्मयीन बाज अजिबात नाही. व्यक्तिरेखा वा घटना नाट्यमय करण्याचा आटापिटा नाही. प्रत्यक्ष घडलेल्या घटनांमधील नाट्यच इतके स्वयंसिद्ध आहे की हकीकत सांगूनही भागते; आणि वाचक त्यातही गुंतून राहतो.

पोलिसांकडे गुन्हा घडला की तक्रार नोंदवली जाते; आणि गुन्हेगाराचा शोध लावण्यासाठी संबंधित-संशयित व्यक्तींचे जाबजबाब घेतले जातात; त्यातून गुन्ह्याशी संबंधित अनेकविध ज्ञान-अज्ञात तपशील कळतात; त्या आधारे खऱ्या गुन्हेगारापर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला जातो. गुन्हा नोंदवताना प्रथम ज्याच्याविषयी संशय घेतला जातो, तोच माणूस खरा गुन्हेगार असतो, असे क्वचितच घडते; खरा गुन्हेगार त्यापेक्षा वेगळाच असू शकतो असेही अनेक प्रसंगी अनुभवाला येते. चतुर रहस्यकथालेखक याच गोष्टीचे भांडवल करून वाचकांना खेळवण्याची, चकविण्याची पुरेपूर काळजी घेतात. कोणाला तरी अपराध्याच्या रूपात पेश करून त्या अपराधामागे काही कारणपरंपरा उभी करतात; आणि नंतर तिच्यात कुठला तरी कच्चा दुवा दाखवून दुसऱ्याच कोणा व्यक्तीला खरा अपराधी म्हणून पेश करून वाचकांना आश्चर्यचकित करून सोडतात.

व. कृ. जोशी यांच्या पोलिसकथांमध्येही असे अनेकदा होते; कथेच्या आरंभीच्या तपशीलातून जाणवणारे गुन्ह्याचे स्वरूप आणि त्याच्याशी संबंधित व्यक्ती आणि कथेच्या शेवटी उलगडणारे गुन्ह्याचे स्वरूप व खरी गुन्हेगार व्यक्ती- यात बहुतेक वेळा मोठेच अंतर दिसते. सत्य हे कल्पनेपेक्षाही अधिक चमत्कृतिपूर्ण असते या विधानाची प्रचीती या छोट्या छोट्या कथांमधूनही येते; आणि त्यामुळे वाचकाला या कथांची भूल पडते. त्यातील रहस्य त्याला चक्रावून सोडते.

'कामगाराचा खून' ही कथा घ्या. कामगारांच्या दोन युनियनमधील संघर्षामुळे एका



फॅक्टरीतले वातावरण तंग असते. अशा वेळी एका वॉचमनचा दौलतीचा रात्री खून होतो. दुसऱ्या गटाच्या कामगारांशी त्याची बाचाबाची झालेली असल्याने त्या झटापटीत त्याला मृत्यू आला असावा असे सकृत् दर्शनी दिसते. या वॉचमनशी भांडण झाल्याचे प्रतिस्पर्धी गटाचे तीन कामगार मान्यही करतात; पण 'त्याला आम्ही मारले नाही' असे ते सांगतात. नंतर चौकशी करता त्याची बायको तेथील मॅनेजरकडे गेस्ट हाऊसवर कधीकधी रात्री कामाला जाते असे कळते; त्यामुळे नवराबायकोत भांडणे होतात; मारहाणही होते असे शेजारच्या बायकांकडून पोलिसांना कळते. एक संशयित सांगतो की या प्रकरणात युनियनचे राजकारण आणू नका. कँटिनमध्ये दोन कामगार ह्याच्याकडे बघून "तू इथं रात्रपाळीवर; आणि तुझी बायको तिकडे साहेबाबरोबर मजा मारतेय"असे म्हणतात. तेव्हा दौलती त्यांच्यावर धावून जातो. मारामारी होते. त्याचे कपडे फाटतात. त्याला लागते. तो तिरीमिरीत साहेबाच्या बंगल्यावर जाऊन आरडाओरडा करतो. त्याची बायको बाहेर येते तर तिला मारहाण करू लागतो. बायको कमला त्याला म्हणते, "भलतेसलते बोलाल तर मी घरी पाऊल ठेवणार नाही."... ती घरी येते. गोविंदा पुन्हा ड्युटीवर जातो. पहाटे त्याचा मुडदा गेटपाशी दिसतो... अधिक चौकशी करता बंगल्याचा पहारेकरी सांगतो,"कमला बंगल्यावर स्वयंपाकासाठी यायची. मॅनेजर येथे येत तेव्हा फॅक्टरी मालकांची पत्नी रजनीही येथे येई. त्यांच्यासाठी कमला स्वयंपाक करी. रजनीदेवीचा कमलावर विश्वास होता. ती तिला चांगल्या साड्या देई. भेटी देई." मग दौलतीचा खून कुणी केला? तो पहारेकरी सांगतो,"कमला बाहेर आली तेव्हा तिच्याबरोबर रजनीही होती. गोविंदा तिला उद्देशून म्हणाला, "रांडे, हे धंदे करतेस तू?" तेव्हा रजनी चिडून म्हणते,"या नीचाला जिवंत ठेवता कामा नये." मॅनेजर पहारेकऱ्याला तसे सुचवतो, तेव्हा तो नकार देता. "तू भेकड निघालास. मलाच हे काम करायला हवे" म्हणून मॅनेजर गेस्ट हाऊसबाहेर पडून दौलतीच्या पोटात सुरा खुपसतो. तो सुरा गाडीच्याच डिकीत मिळतो.

**रहस्यकथालेखक याच गोष्टीचे भांडवल करून वाचकांना खेळवण्याची, चकविण्याची पुरेपूर काळजी घेतात. कोणाला तरी अपराध्याच्या रूपात पेश करून त्या अपराधामागे काही कारणपरंपरा उभी करतात;**

... दौलतीच्या खुनाची बातमी आल्यावर प्रथम विरोधी युनियनच्या कामगारांवर संशय घेतला जातो. तो स्वाभाविकही वाटतो. पुढे बायकोच्या वर्तनामुळे तिच्याकडे आणि तिला बोलावणाऱ्या मॅनेजरकडे लक्ष जाते. त्या दोघांचे संबंध असावेत असे वाटते. पण तेथे रजनी असल्याने, कमला निर्दोष ठरते. आणि पहारेकऱ्याकडे संशयाने बघितले जाते. पण शेवटी वेगळेच सत्य ज्ञात होते.

असे गुन्हेगारांचे चकवणारे, गुंगारा देणारे हे जग या पोलिसकथांमधून समोर येते. या कथा सत्यघटनांवर आधारित असल्याने त्यातले गुंते अधिकच परिणामकारक वाटतात.

व. कृ. जोशी यांच्या पोलिसकथांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यातून घडणारे विविधांगी समाजदर्शन. वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीवरच्या या घटना. त्यात समाजाचे विदारक दर्शन घडते.

मतिमंदांसाठी वसतिगृह चालवणाऱ्या समाजसेवकांकडे समाज आदराने पाहतो. पण याच मुलांचे फसवून डोळे काढून घेऊन गब्बर होणारे डॉक्टर येथे आढळतात. डॉक्टर, संस्थाचालक यांचे असले रॅकेटही येथे बिनबोभाट चालते (हरवला). प्रेयसीच्या प्रेमपत्रांवरून तिला ब्लॅकमेल करण्याचे प्रकार येथे आढळतात; (अखेर जमलं) तसेच खोट्या नोंदी करणारे खास दंडाधिकारीही, खुनाला आत्महत्येचे रूप देऊ पाहतात. समाजसेवा करण्यासाठी काही तरुण गावात येतात तर त्यांच्या बदनामीसाठी त्यांच्यावर स्त्रियांच्या संदर्भातील आरोप ठेवण्याचे प्रकारही येथे सर्रास केले जातात (नवा कायदा). आपल्याला आश्रय देणाऱ्या सच्छील दयाळू कुटुंबालाच अडचणीत आणणाऱ्या उनाड तरुणीही येथे भेटतात.(अनाथ); गुन्हेगाराच्या मानसिकतेचे एकापेक्षा एक अजब नमुनेही या कथांमध्ये आपल्याला दिसतात.

नवरा मूल देण्यास असमर्थ; पत्नीमागे सासूचा पुत्राबद्दलचा धोशा. त्यातून होणारे तणाव. मनोमालिन्य. अशा वेळी पत्नीने दूर होऊन घटस्फोटाचा प्रयत्न केला तर सासूला बदनामीची भीती वाटते. ती संधी साधून सुनेचा काटा दूर करू पाहते. झोपेच्या गोळ्या तिच्या कॉफीत मिसळून तिला ठार मारते. (खास संदेश).

**व. कृ. जोशी यांच्या पोलिसकथांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्यातून घडणारे विविधांगी समाजदर्शन. वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीवरच्या या घटना. त्यात समाजाचे विदारक दर्शन घडते.**

विवाहबाह्य संबंधांचेही कथांमध्ये भेटतात. त्या अनेक नमुने या संबंधांचे ताणतणाव अनेकांची आयुष्ये उद्ध्वस्त करायला कारणीभूत ठरतात. गुन्ह्याच्या जागी एखादी क्षुल्लक गोष्ट अशी आढळते की तिचा मागोवा घेत राहिल्यावर गुन्हेगारापर्यंत पोचता येते.

समाजातील आपली प्रतिष्ठा व स्थान टिकून राहावे, आपल्या घराण्याच्या इभ्रतीला, कीर्तीला कलंक लागू नये म्हणूनही अनेकदा गुन्हे घडतात; आणि काही वेळा अभावितपणे, अपघाती हत्याही होतात. सद्हेतूनेही कधी कधी गुन्ह्याचा मार्ग चोखाळला जातो. नीति-अनीतीचा विचार तेथे कायद्याच्या कलमांपेक्षा वेगळ्या प्रकारे लावावा लागतो. पोलिसांमधील माणुसकीचीही तेथे कधी कधी कसोटी लागते.

... व. कृ. जोशी यांच्या पोलिसकथा या केवळ गुन्ह्याचा तपास लावण्याच्या हकिकती नाहीत; त्या समाजातील विविध अंत:प्रवाहांचे विस्मयकारक दर्शन घडवणाऱ्या, मानवी नात्यांमधील अनाकलनीय गुंते प्रकट करणाऱ्या, रूढ नीतिकल्पनांमधील आणि कौटुंबिक मूल्यांमधील लटक्या संभावितपणाचा पर्दाफाश करणाऱ्या, वास्तवातले नाट्य टिपणाऱ्या संसारकथाही आहेत. त्यांना सहृदयतेचा, करुणेचा स्पर्श झालेला आहे.

**पृष्ठे : २०४ ● किंमत : १५० रु. ● सभासदांना : ११२ रु. ● पोस्टेज : २५ रु.**



## पुरस्कार

### * डॉ. सदानंद मोरे यांना 'श्री संत तुकाराम महाराज सेवाभूषण पुरस्कार

''तेजस्वी परंपरेचा स्वार्थासाठी वापर केला. तर ऱ्हासाला सुरवात होते,'' असे मत संत साहित्याचे अभ्यासक दिलीप चित्रे यांनी ५ जून रोजी व्यक्त केले.

संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज सेवा प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. चित्रे यांच्या हस्ते संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांना 'श्री संत तुकाराम महाराज सेवाभूषण पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

चित्रे म्हणाले,''तेराव्या-चौदाव्या शतकात मराठी वाङ्मयाची मुहूर्तमेढ वारकरी संप्रदायाने रोवली. तेराव्या शतकात निवृत्तिनाथांपासून ते सतराव्या शतकात बहिणाबाईंपर्यंत वारकरी संप्रदायाची देदीप्यमान परंपरा होती. अठराव्या शतकात ती लोप पावली. वारीसारखी यात्रा जगात दुसरी नाही. मात्र, वारी सुरू राहिली, पण त्यात कर्मकांडे आली.''

तुकाराम महाराजांशी त्यांचे समकालीन लोक कसे वागले, यासह विविध गोष्टींचे चिकित्सक वर्णन डॉ. मोरे यांनी केले आहे, असे त्यांनी सांगितले.

डॉ. मोरे म्हणाले,''तुकाराम महाराजांच्या अभंगात सेवेला महत्त्व आहे. सेवाभक्तीचा उत्कट व सर्वोत्कृष्ट आविष्कार त्यांच्या चरित्रात आढळतो. मी या परंपरेचा नम्र सेवक आहे.''

प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुमंत महाराज ओतूरकर यांचेही या वेळी भाषण झाले. चंद्रकांत वांजळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. संतोष जगनाडे यांनी सूत्रसंचालन केले.

### * गंगाधर पानतावणे यांना नारळकर विद्वत पुरस्कार

नगर येथील ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्र प्रणीत नानासाहेब नारळकर विद्वत पुरस्कार औरंगाबाद येथील ज्येष्ठ विचारवंत डॉ. गंगाधर पानतावणे यांना देण्यात आला. सन्मान चिन्ह व दीड हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. चार्टर्ड अकाउंटंट बाळासाहेब नारळकर यांनी ठेवलेल्या कायम निधीवरील व्याजातून हा पुरस्कार देण्यात येतो.

डॉ. पानतावणे यांनी डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मराठी विभागप्रमुख म्हणून काम पाहिले. विविध विषयांवर त्यांनी पंधरा ग्रंथ लिहिले असून, नऊ ग्रंथांचे संपादन केले आहे. महाराष्ट्रातील दलित पुनरुत्थानाच्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. पुरस्कार वितरण समारंभ नगरच्या यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात आमदार यशवंतराव गडाख यांच्या अध्यक्षतेखाली व 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांच्या हस्ते झाला.

### * पत्रकारामधील सकारात्मक दृष्टिकोनाचा लोप- प्रा. मेश्राम

वर्तमान स्थितीत पत्रकारांमधील सकारात्मक दृष्टिकोन लोप पावत चालला आहे. त्याचे विपरीत प्रतिबिंब वृत्तपत्रातही पडत असल्याने ते समाजासाठी विघातक ठरत आहे,

अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक प्रा. केशव मेश्राम यांनी व्यक्त केली.

मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने आयोजित ४७ व्या वृत्तपत्र लेखक संमेलनप्रसंगी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंतांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मेश्राम पुढे म्हणाले की, १० टक्के आरक्षणातील घरे मिळविणारे कधीही नि:पक्षपातीपणे लेखन करू शकत नाहीत. नुकत्याच लागलेल्या देशातील निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर वृत्तवाहिन्यांचे नाव न घेता ज्येष्ठ समाजसेवक फ्रान्सिस दिब्रिटो म्हणाले की, देशातील अडाणी माणूस शहाणा झाला असून देशाला खरा धोका सुशिक्षितांचाच आहे.

पुरस्कार विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे-

प्रभाकर पाध्ये स्मृती पुरस्कार- प्रताब आसवे

डॉ. ना. भि. परुळेकर स्मृती पुरस्कार - सोमनाथ समेळ

पु. रा. बेहरे स्मृती पुरस्कार - युवराज मोहिते

श्रीकांत पालेकर स्मृती पुरस्कार - सुनील शिंदे

द. म. सुतार स्मृती पुरस्कार - सुरेंद्र सोमण

यशवंत कृष्णाजी खाडिलकर स्मृती पुरस्कार - श्रीकांत बोजेबार

मालतीबाई तेंडुलकर स्मृती पुरस्कार - जयश्री खाडिलकर

वैद्यकीय रुग्णसेवा पुरस्कार - डॉ. मनोज भाटवडेकर

कस्तुरबाई दोशी स्मृती पुरस्कार - मे. सुभाष गावंड

पु. ल. देशपांडे स्मृती पुरस्कार - विकास सबनीस

अनंत अस्लेकर स्मृती स्तंभलेखन पुरस्कार - प्रल्हाद जाधव

कायदाविषयक लेखन पुरस्कार - सुरेशचंद्र वैद्य

दादाजी वैशंपायन समाजप्रबोधन पुरस्कार - श्रद्धानंद महिला आश्रम.

### * डॉ. शां. ग. महाजन यांना श्रीपाद जोशी पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे गुणवत्तापूर्ण लेखनाबद्दल डॉ. शां. ग. महाजन यांना यंदाचा श्रीपाद जोशी विशेष ग्रंथकार पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'पुणे शहराचा ज्ञानकोश खंड १' या संदर्भग्रंथासाठी महाजन यांना हा पुरस्कार मिळाला आहे.

सन्मानपत्र, रोख रुपये पाच हजार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

श्रीपाद जोशी ग्रंथ पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष असून संदर्भ ग्रंथ, उत्तम अनुवाद व आंतरभारती कार्य यासाठी हा पुरस्कार देण्यात येतो.

### * कथा स्पर्धा पुरस्कार

डोंबिवली येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखेने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कथा स्पर्धेत १४७ कथाकारांनी भाग घेतला. पुरस्कार विजेते - १. सौ. पूर्वा प्रमोद अष्टपुत्रे, अंबरनाथ. २. अमोल सुभाष बागूल (अहमदनगर), ३. पंडित तुकाराम आंबिलढोक (कोल्हापूर). प्रा. सौ. रेखा मैड यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

❒



## श्रद्धांजली

### * प्र. न. जोशी

प्रल्हाद नरहर उर्फ प्र. न. जोशी हे एक व्युत्पन्न पंडित होते. संतवाङ्मयाच्या अभ्यासाची आणि निरुपणाची समृद्ध परंपरा असणाऱ्या घरातच जन्म झाल्याने त्यांच्यावर संस्कार झाले, ते संतांच्या शिकवणुकीचे. आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर, तरुण वयात त्यांनी लेखनावरच उदरनिर्वाह करण्याचा संकल्प सोडला आणि तो पूर्णही करून दाखविला.

त्यांनी आयुष्यभर ध्यास घेतला. तो अभ्यासाचा आणि ग्रंथसंग्रहांचा. 'एकांतेवीण प्राणियांते बुद्धि कैची' असे रामदासांनी म्हटले आहे. प्र. न. यांनी या संतवचनाचा नेमका अर्थ जाणला होता. त्यामुळेच त्यांनी विचारपूर्वक आपल्या आयुष्याचा मार्ग ठरविला आणि त्यावरून वाटचाल करताना अधिकाधिक एकांत मिळून विद्याभ्यास विनासायास होत जाईल, याची काळजी घेतली. त्यांचा संत वाङ्मयाचा अभ्यास चांगलाच होता; परंतु त्यांच्या स्वभावाचा विशेष हा की, ते संतसाहित्याकडून विज्ञानाकडे वळले आणि त्याही विषयांत त्यांनी चांगले कोश तयार केले. एवढेच नव्हे, तर हिंदी भाषा आणि त्यातील साहित्य याबाबतही त्यांना उत्सुकता होती आणि त्याचाही अभ्यास त्यांनी केला होता. आपली पावले बदलत्या काळानुसार पडावीत आणि आजच्या समाजाला उपयुक्त ठरतील अशी ग्रंथसंपदा निर्माण व्हावी, यावर प्र. न. जोशी यांचा कटाक्ष होता. त्यांच्या प्रचंड लेखनकार्यात चरित्रांपासून ते मराठी वाङ्मयाच्या इतिहासापर्यंत आणि कादंबरीपासून ते चरित्रापर्यंत अनेकानेक विषय साकारलेले दिसतात. त्यांनी तयार केलेला शब्दकोश जसा अजोड आहे, तशीच त्यांच्या अभ्यासपूर्ण विवेचनासह प्रसिद्ध झालेली संतवाङ्मयाची रसाळ संकलनेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सततच्या वाचनातून मानसिक समाधान मिळवायचे आणि बौद्धिक कष्टातूनच आनंद मिळवायचा असे मानणाऱ्या अभ्यासकांच्या प्रभावळीतले ते होते.

### * ज्येष्ठ स्तंभलेखक डॉम मोराइस

प्रख्यात लेखक आणि स्तंभलेखक डॉम मोराइस यांचे २ जून रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते.

'इंडियन एक्स्प्रेस'चे दिवंगत संपादक फ्रँक मोराइस यांचे ते पुत्र होते. मोराइस यांचा जन्म मुंबईतच १९३८ साली झाला.

वयाच्या बाराव्या वर्षी डॉम यांनी कविता लिहिण्यास सुरुवात केली. ते पंधरा वर्षांचे असताना डब्ल्यू. एच. ऑडेन यांनी त्यांच्या कविता वाचल्या आणि त्यांना त्या आवडल्या.

स्टीफन स्पेंडर यांनी त्या 'एन्काऊटर'मध्ये तर कार्ल शापिरो यांनी 'पोएट्री शिकागो'मध्ये प्रसिद्ध केल्या. अवघ्या एकोणिसाव्या वर्षी त्यांच्या कवितांचे पहिले पुस्तक 'ए बिगिनिंग' लंडनच्या पार्टन प्रेसने प्रकाशित केले. त्याला 'हाऊथॉर्नडेन' हा पुरस्कार मिळाला. त्यांचे दुसरे पुस्तक 'ऑटम चॉईस ऑफ दि पोएट्री बुक सोसायटी' चे मानकरी ठरले. लंडन, हाँगकाँग आणि न्यूयॉर्क येथील अनेक नियतकालिकांचे ते संपादक होते. याशिवाय त्यांनी अनेक युद्धांचे वार्तांकनही केलेले आहे. त्यांनी एकूण २२ पुस्तके लिहिली.

*** ज्येष्ठ दलित साहित्यिक अप्पासाहेब रणपिसे**

दलित साहित्य संघाचे संस्थापक आणि दलित साहित्यिक अप्पासाहेब रणपिसे (वय ७५) यांचे ३१ मे रोजी निधन झाले.

बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४८ मध्ये दलित साहित्याची चळवळ निर्माण व्हावी,असे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद म्हणून अप्पासाहेबांनी प्रथमच दलित साहित्य संघाची स्थापना केली. बाबासाहेब प्रकाशित करत असलेल्या जनता पत्रातूनही ते कथा, कविता आदी लेखन करत असत. १९६० मध्ये त्यांनी दलित साहित्य संघाचे नामांतर 'महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषद' असे केले.

दलित साहित्याच्या प्रसारात परिषदेची महत्त्वाची भूमिका होती. अप्पासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली दलित साहित्यिकांची नवी पिढी तयार झाली.

अप्पासाहेबांच्या निधनामुळे आंबेडकरी साहित्य चळवळीतील एक ज्येष्ठ विचारवंत काळाच्या पडद्याआड गेला, अशा शब्दांत भारतीय रिपब्लिकन पक्ष-बहुजन महासंघाचे अध्यक्ष राजा ढाले यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

*** पहाडी आवाजाने रसिकांना रिझविणारे गायक प्रल्हाद शिंदे कालवश**

आपल्या पहाडी आवाजाने गेली ४५ वर्षे रसिकांना रिझविणारे सुप्रसिद्ध गायक प्रल्हाद भगवान शिंदे यांचे काल सायंकाळी येथील श्री हॉस्पिटलमध्ये निधन झले. ते ७५ वर्षांचे होते.

'पाऊले चालती पंढरीची वाट', 'ऐका सत्यनारायणची कथा', 'जरी संकटाची काळ रात्र होती, तरी भीमराया तुझी साथ होती', अशा प्रकारची भक्तीगीते, लोकगीते, भीमगीते गाऊन, गायनाच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती करणारे प्रल्हाद शिंदे यांच्या आवाजावर प्रेम करणारे लक्षावधी चाहते महाराष्ट्रात व देशातही आहेत. प्रल्हाद शिंदे यांनी गायलेली सर्वच भक्तीगीते अजरामर झाली आहेत. महाराष्ट्रात आषाढी एकादशीच्या दिवशी होणारा विठू नामाचा गजर असो की गणेशोत्सव असो, या दोन्ही उत्सवात सारा महाराष्ट्र प्रल्हाद शिंदे यांच्या गाण्यांनी दुमदुमून जातो. त्यांनी गायलेले 'बाप्पा मोरया रे' हे गाणे तर कमालीचे लोकप्रिय झाले आहे.

मंगळवेढा येथे जन्माला आलेले प्रल्हाद शिंदे आपल्या गीतांनी कितीही नामांकित झले, तरीही इतरांची गाणी गाण्यात त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही.

कै. वामनदादा कर्डक, दामोदर शिरवाळे अशा ख्यातनाम गायकांची अनेक गाणीही त्यांनी गायली आहेत.

❐



## २००४ मध्ये लोकप्रिय ठरलेली नवीन पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| *कादंबरी* | | |
| टाइमलाइन : मायकेल क्रायटन | अनु:प्रमोद जोगळेकर | ३६० |
| काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस | अनु: सरिता पदकी | १५० |
| सीमारेषा | माधवी देसाई | २०० |
| काबुलीवाल्याची बंगाली बायको | अनु: मृणालिनी गडकरी | १०० |
| द रेनमेकर : जॉन ग्रिशॅम | अनु: अनिल काळे | ३८० |
| फर्स्ट टु डाय : जेम्स पॅटरसन | अनु: रविंद्र गुर्जर | २०० |
| द ब्लाइन्ड असॅसिन : मार्गरेट ॲटवूड | अनु: चारुता नानिवडेकर | २५० |
| कथा | | |
| ईगीन | महादेव मोरे | १५० |
| 'हॅलो मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय' | व. कृ. जोशी | १२० |
| पोलिसकथा | व. कृ. जोशी | १५० |
| *ललित* | | |
| सांजसावल्या : वि.स. खांडेकर | संपा: डॉ.सुनीलकुमार लवटे | ८० |
| रंगल्या रात्री | संकलन: अरुण शेवते | ८० |
| रात्ररंग | संकलन: अरुण शेवते | १८० |
| मुखवटे: वि.स.खांडेकर | संपा: डॉ.सुनीलकुमार लवटे | ७० |
| साहित्यिकाचा गाव | आनंद यादव | ९० |
| स्पीड पोस्ट : शोभा डे | अनु.अपर्णा वेलणकर | २५० |
| टेक् २५: भावना सोमय्या | अनु: अंजनी नरवणे | ४०० |
| या सुखांनो | सुरेश वसंत नाईक | १७० |
| *वैचारिक* | | |
| म्हणे कबीर दिवाणा : ओशो | अनु: भारती पांडे | १२० |
| दुसरे प्रॉमिथिअस: महात्मा गांधी | संपा: डॉ. सुनीलकुमार लवटे | ७० |
| अज्ञाताच्या महाद्वारात: वि. स. खांडेकर | संपा: डॉ. सुनीलकुमार लवटे | ५० |
| वन्हि तो चेतवावा: वि. स. खांडेकर | संपा: डॉ. सुनीलकुमार लवटे | ७० |
| *चरित्रे* | | |
| थॉट लीडर्स : श्रीनिवास पंडित | अनु: सुप्रिया वकील/वाडकर | ३०० |
| फिटे अंधाराचे जाळे | भालचंद्र करमरकर | १२० |
| जीवनयात्रा अभिनेता दिग्दर्शक मा.विनायक | भाई भगत | १५० |
| *विज्ञान* | | |
| बिजलीदेवीची कहाणी | गोविंद लक्ष्मण परांजपे | ८० |
| विदेशी विज्ञान चित्रपट | निरंजन घाटे | १२० |

| | | |
|---|---|---|
| **वायू प्रदूषण** | **डॉ.किशोर/सौ. नलिनी पवार** | **१५०** |
| **डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी** | **डॉ.विकास/डॉ. विनीता गोगटे** | **२५०** |
| *मार्गदर्शनपर* | | |
| **आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्रः अनंत पै** | **प्रशांत तळणीकर** | **८०** |
| **सुजाण पालकत्व** | **मीना टाकळकर** | **६०** |
| *व्यक्तिमत्व विकसन* | | |
| **तो आणि ती** | **अनुः डॉ. रमा मराठे** | **२५०** |
| *आत्मकथन* | | |
| **द जॉय ऑफ कॅन्सरः अनुप कुमार** | **अनु.माधुरी शानभाग** | **१५०** |

## मला आलेले अतींद्रिय अनुभव

**दिवाळी अंक**

**वाचकांसाठी लेख स्पर्धा..**

आपल्या नेहमीच्या जीवनात असे काही अनुभव येतात की आपल्या बुद्धीच्या वा तर्कशक्तीच्या मर्यादेत त्यांची संगती लावता येत नाही. भावी संकटाची पूर्व सूचना मिळणे, दुर्धरव्याधी अचानक दूर होणे, अपघातानंतर व अनपेक्षित मदत मिळणे, अरिष्ट टळणे, यांचे अनुभव अनेकांना आलेले दिसतात. योगसाधना, प्राणायाम याद्वारेही काही सिद्धी कोणाला प्राप्त झालेल्या असतात. कुंडलिनी जागृती, मृत्यूनंतरचे अस्तित्व वगैरेचाही अनुभव कोणाला आलेला असतो. संतमहात्म्यांच्या सहवासात वा स्पर्शानेही अशा काही गोष्टींची प्रचीती येते. काही विशिष्ट स्थळी आपल्याला काही वेगळे जाणवले असेल.

आपल्याला असे काही अनुभव आलेले असतील तर त्याबद्दलची सविस्तर माहिती आम्हाला कळवा.

**शब्दमर्यादा - १००० शब्द. मुदत - १० ऑगस्ट २००४.**


**सर्वोत्कृष्ट ठरणारे पहिले पाच लेख दिवाळी अंकात प्रसिद्ध करण्यात येतील; आणि त्यांना प्रत्येकी २०० रुपये पुरस्कार देण्यात येईल.**

**आमचा पत्ता - संपादक, मेहता मराठी ग्रंथ जगत.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१ सदाशिव पेठ,**

**माडीवाले कॉलनी, पुणे - ४११ ०३०.**






**अनुक्रमणिका**


सगळ्यात उत्तम खेळ ४४
शब्दांची फास्ट ट्रेन ५१
पोटोबा (कविता) ५४
नवीन स्पर्धा ५५
स्पर्धा निकाल ५६


सगळयात उत्तम खेळ
शब्दांकन : शंकर सारडा
त्या दिवशी गोवर्धन माकडवाला आपल्या गट्टू आणि झुमकी या माकडांबरोबर बाजारात गेला.
गोवर्धनकडे दोन माकडे होती. गावोगाव त्यांचा खेळ करून तो आपले पोट भरे.
गट्टू, बाबा आजकाल फार उदास दिसताहेत.
त्याचे कारण शोधायला हवे.
TIKKU'S CORNER
अरे गोवर्धन, कसा चाललाय तुझा धंदा?
वाईट अगदी वाईट
आज दिवसभरात एवढीच कमाई झाली. कसं पोट भरायचं एवढ्यात?
माकडांचे तेच ते खेळ बघून लोक कंटाळले असतील.


नवे खेळ तर खूप करावेसे वाटतात. गट्टूला सायकल घेतली तर -
पण सायकलीसाठी पैसे कुठून आणू? पोटापुरतेही पैसे मिळत नाहीत.
टिक्कूच्या कॉर्नरमधील दाल-रोटी म्हणूनच खायला मिळत नाही.
म्हणूनच तर सध्या आपल्याला केवळ चणे खाऊन राहावे लागतेय.
आपण काहीतरी करायला हवे.बाबांचा उदास चेहरा मला बघवत नाही.
नक्कीच उद्यापासून काहीतरी करू या. चला, घर आले, आता आराम करू.
दुसऱ्या दिवशी
अरे बाळांनो, उठा सकाळ झाली.
लौकरच
डम डम- डम डम डिंग डिंग डाँग डाँग


मायबापांनो, या या. गट्टू-झुमकीचा खेळ बघा.
ढम ढम ढमाक ढम
हीमाकडांचीजोडी मस्त खेळ करतेय. पण नवे काही नाही. हे घे...
धन्यवाद महाशय
चला, पुढच्या चौकात. पण आधी त्या नळाच्या कोंडाळ्यावर जाऊन पाणी पिऊ.
तुम्ही दोघे इथं बसा रे. मात्र काही खोड्या करू नका.
अरे, बस आली का!
इतक्या उशिरा!
अरे, ढकलू नका. क्यू मध्ये या.
गट्टू, तिकडे बघ.




पाकिट मिळाले?
हो मिळाले.
पाचशे रुपये! वा! मस्त!
माझा हिस्सा?
झुमकी, किती सोपं आहे हे!
गट्टू, पाकिटमाराची सफाई बघितलीस?
तू छोटी आहेस. तूच पुढं हो.




आज कुठला सिनेमा बघायचा?
पाकिटमार. नवीनच लागलाय. चल, तीच बघू.
जमलं की!
बाबा श्रीमंत होतील.
गट्टू, झुमकी या रे या.
काय?
खिःखिः
खिःखिः
बघा तर खरं!
बघा तर खरं!
कुणाचं पाकिट आहे हे?




तुम्ही हे पाकिट मारलंत? चोरलंत?
?
?
फारच वाईट! अरे, आजवर मी सन्मार्गानं जगत आलोय. काय केलंत तुम्ही हे!
पुन्हा असं कधी करू नका. समजलं?
यात पाकिटाच्या मालकाचं नाव पत्ता आहे त्याला हे परत करायला हवे.
लौकरच
तुमचे आभार कसे मानू हेच कळत नाही.
ते माझं कर्तव्यच होतं.
थांबा जरा. तुम्ही तिघंही जरा इथं बसा.





# चालवा शब्दांची फास्ट ट्रेन

**खाली दिलेले शब्द वेगात वाचा आणि पहा शब्दांची ट्रेन कशी धावते ती! तुमच्या मित्रांनाही हे शब्द वेगाने वाचायला लावा - आणि लावा शर्यत ! चला तर रेडी स्टेडी गो -!**

कार - खार - गार - घार - चार - जार - झार - तार - दार - धार - नार - पार - फार - बार - भार - मार - यार - वार - सार - हार - क्षार

काळा - गाळा - चाळा - जाळा - झाळा - ताळा - थाळा - पाळा - वाळा - बाळा भाळा - माळा - शाळा

कसा - खसा - घसा - तसा - धसा - नसा - पसा - बसा - भसा - रसा - लसा - वसा - ससा - हसा

कडक - खडक - तडक - थडक - धडक - फडक - भडक - लडक - सडक

काय - खाय - गाय - चाय - पाय - बाय - माय - भाय - साय - हाय

कचक - खचक - गचक - दचक - पचक - बचक - लचक - वचक

कडून - घडून - जडून - झडून - दडून - नडून - पडून - रडून

घडव - जडव - दडव - नडव - पडव - बडव - रडव - सडव

कळव - जळव - दळव - पळव - फळव - वळव - मळव

बावळा - आवळा - कावळा - मावळा - सावळा

कारवा - गारवा - पारवा - मारवा - सारवा

कापड - झापड - पापड - सापड




**पोटोबा**

वाघाच्याही मनात आले,
डॉक्टरकीचे शिक्षण घ्यावे;
प्राण्यांच्या शस्त्रक्रियेवर
पुस्तक छान लिहावे!




रानातून त्याने मग
हरीण पकडून आणले;
मधेच लागता भूक
कागद, पेनच विसरले!




पोलिस प्रशिक्षण घेऊन
बोके साहेब आले;
पहिला छापा गोदामावर
योजना करू लागले!



''कृपा करा, कृपा करा''
उंदीरशेट विनवू लागले;
''हंडाभर दूधमलाई
गुपचुप देऊ,''म्हणाले!



गृहमंडळाचे संचालक
अजगरराव निवडून आले;
''आराम हराम है'' चा नारा
झोपेतच फुसफुसले!



''आधी हलवा झोपडपट्टी
मुंग्यांच्या वारुळांची;
नंतर घेऊ खबरबात
पाखरांच्याही घरट्यांची!''

''हा तर सगळा अन्यायच,''
बगळे महाशय चिडचिडले;
सत्याग्रहाची घोषणा
करून लगेच उडाले!



म्हणत, ''मी तर संन्यासी!''
तळ्याकाठी जाऊन बसले;
आतील मासे बघत बघत
उपवास महिमा गाऊ लागले!

''ही तर निव्वळ फसवेगिरी,''
गाढव रेकू लागले;
न्यायाधीशाच्या खुर्चीवर
स्वत:च जाऊन बसले!

न्याय मागायला पण
कुणीच नाही फिरकले;
पोटोबाच्या सोयीसाठी
सगळेच रानात भटकले!


**शंकर विटणकर**
**नागपूर**





**नवी स्पर्धा**

# ठिपके जोडा व चित्रं रंगवा!



वरील चित्र ठिपके जोडून पूर्ण करा आणि आवडत्या रंगांनी रंगवा.

**चित्र छान रंगवून पाठवणाऱ्या पहिल्या ३ मुलांना छान छान चित्रांची आकर्षक २ पुस्तके बक्षीस! चित्रं पाठवताना आपले नाव, पत्ता व इयत्ता लिहायला विसरू नका.**

**मुदत १० ऑगस्ट २००४पर्यंत!**

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथ जगत**, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०

# स्पर्धा निकाल

## जून २००४ अंकातील कोणती सावली कोणाची? स्पर्धा

### अचूक उत्तर

अ- ५, ब- ६, क- १, ड- ३, इ- ४, फ- २

### यशस्वी स्पर्धक

१) **साक्षी राजेंद्र वाणी,**(१ली)सी-७/१, अलोरे वसाहत, चिपळूण, रत्नागिरी
२) **अंकीत रमेशचंद्र भांडेकर,** साईनगर, सत्यम टॉकीज रोड, गडचिरोली
३) **आकाश विजय नरवडे,** मु. पो. टाकळी (खातगाव) अहमदनगर

## जून २००४ अंकातील ओळखा पाहू स्पर्धा

### अचूक उत्तर

एकूण वस्तू १९

फूल, पेन, पेस्ट, चाकू, स्टूल, कप, किल्ली, कुलूप, टेबललॅम्प, वही, बासरी, ब्रश, फासा, सफरचंद, बॅट, स्क्रू- ड्रायव्हर, टेबलटेनीसची बॅट-बॉल, फुलपाखरू, माचीसची काडी

### यशस्वी स्पर्धक

१) **समृद्धी खटावकर,**(२री) द्वारा शोभा पाटील, ४/१२०, जयप्रकाश सोसा. माळवाडी हडपसर, पुणे- २८
२) **ऐश्वर्या घाणेकर,**(४थी) एन् डी. ४, ४ डब्ल्यू, ९/२, रामनगर सिडको, नवीन नांदेड
३) **समीर संजय नेवे,**सी/२२, संकल्प, आनंदनगर, दहिसर (पू) मुंबई

**यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन!**
**तुमचे बक्षीस लवकरच पाठवत आहोत!**







# छान छान पुस्तके

**पोस्टेज प्रत्येकी २०रु.**

## पंचतंत्र

| | | |
|---|---|---|
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | २५ रु. |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | २५ रु. |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | २५ रु. |
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | २५ रु. |

## हितोपदेश

| | | |
|---|---|---|
| हितोपदेश : बोधप्रद कथा | मोहन वेल्हाळ | २० रु. |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | मोहन वेल्हाळ | २० रु. |
| हितोपदेश : प्रेरक कथा | मोहन वेल्हाळ | २० रु. |
| हितोपदेश : रोचक कथा | मोहन वेल्हाळ | २० रु. |

## जातक

| | | |
|---|---|---|
| जातक कथा : मनोरंजक | निर्मला सारडा | २५ रु. |
| जातक कथा : प्रेरक | निर्मला सारडा | २५ रु. |
| जातक कथा : रोचक | निर्मला सारडा | २५ रु. |
| जातक कथा : शिक्षाप्रद | निर्मला सारडा | २५ रु. |

## बिरबलाच्या गोष्टी

| | | |
|---|---|---|
| लाजवाब बिरबल | निर्मला सारडा | २५ रु. |
| विनोदवीर बिरबल | निर्मला सारडा | २५ रु. |
| बिरबलाचे चातुर्य | निर्मला सारडा | २५ रु. |
| बिरबलाच्या रोचक गोष्टी | निर्मला सारडा | २५ रु. |

# तेनालीरामच्या गोष्टी

| | | |
|---|---|---|
| **तेनालीरामचे चातुर्य** २००३ | मंजुषा आमडेकर | २५ रु. |
| **तेनालीरामच्या रोचक गोष्टी** २००३ | मंजुषा आमडेकर | २५ रु. |
| **तेनालीराम विनोदवीर** २००३ | मंजुषा आमडेकर | २५ रु. |
| **तेनालीरामच्या मनोरंजक कथा** २००३ | मंजुषा आमडेकर | २५ रु. |

# अमरचित्रकथा

| | | |
|---|---|---|
| **राजा हरिश्चन्द्र** २००३ | संपादक : अनंत पै | २० रु. |
| **अभिमन्यू** २००३ | संपादक : अनंत पै | २० रु. |
| **विक्रमादित्य** २००३ | संपादक : अनंत पै | २० रु. |
| **छत्रपती शिवाजी** २००३ | संपादक : अनंत पै | २० रु. |
| **भीष्म** २००३ | संपादक : अनंत पै | २० रु. |
| **पृथ्वीराज चौहान** २००३ | संपादक : अनंत पै | २० रु. |
| **सम्राट अशोक** २००३ | संपादक : अनंत पै | २० रु. |
| **राणा प्रताप** २००३ | संपादक : अनंत पै | २० रु. |
| **प्रल्हाद** २००३ | संपादक : अनंत पै | २५ रु. |
| **श्रीरामाची कथा** २००३ | संपादक : अनंत पै | २५ रु. |
| **कर्ण** २००३ | संपादक : अनंत पै | २५ रु. |
| **चाणक्य** २००३ | संपादक : अनंत पै | २५ रु. |

